।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।


मासिक

# शिक्षण यात्री

▪ वर्ष:५ वे ▪ अंक: २ रा ▪ फेब्रुवारी २०२० ▪ किंमत:३० रूपये





माझ्या मराठी मातीचा,लावा ललाटास टिळा,
हिच्या संगाने जागल्या, दऱ्या खोऱ्यातील शिळा

-कुसूमाग्रज

# माझ्या मराठी मातीचा
# लावा ललाटास टिळा

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्या खोऱ्यातील शिळा

माझ्या मराठी मातीला
नका म्हणू हीन दीन
स्वर्गलोकाहून थोर
मला हिचे महिमान

रत्नजडित अभंग
ओवी अमृताची सखी
चारी वर्णांतुनी फिरे
सरस्वतीची पालखी

रसरंगात भिजला
येथे शृंगाराचा स्वर
येथे अहंता द्रवली
झाले वुसधेचे घर

माझ्या मराठी मातीचा
नका करू अवमान
हिच्या दारिद्र्यात आहे
भविष्याचे वरदान

नाही पसरला कर
कधी मागायास दान
स्वर्णसिंहासनापुढे
कधी लवली ना मान!

-कुसूमाग्रज

वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक

वर्ष : ५ वे

अंक:२रा  फेब्रुवारी २०२०

• मानद संपादक •
सुभाषदादा कुलकर्णी

• कार्य.संपादक •
संदेश नंदकिशोर हजारे

• संपादन सहाय्य •
प्रा.डॉ.माधव कदम
युवराज माने

• प्रतिनिधी सहाय्य •
**पुणे**- रमेश काळे, **मुंबई**- जयपाल गिरासे, **नाशिक**-किरण पाटील, **सोलापूर**- उमेश काळे, **औरंगाबाद**- रवि गारूडकर, **परभणी**- युवराज माने, **जळगांव**- प्रविण माळी, **नंदुरबार**- तुकाराम धनगर, **अमरावती**- रूपेश माने, **कोल्हापूर** - गुलाब बिसेन,

• मुखपृष्ठ •
साभार आंतरजाल...

• अंक मांडणी •
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

- लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
- पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
- सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत

# अंतरंग...

३ अनुभवाचे बोल...
५ मातृभाषेच्या संवर्धनासाठी
९ बोलू कौतूके मराठी
११ नई तालीम
१३ आम्ही आहोतच वेगळे
१७ आनंदाचं झाड
२० संख्यांची गंमत
२१ झाँकीतून खेलायन
२२ आम्हा शाळेचा अभिमान
२४ इतिहासातील पाने
माझी कविता/शिक्षणवार्ता

मासिका विषयी ...
जानेवारी २०२०
नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226
वर्गणी : वार्षिक ₹ ३५०, द्विवार्षिक ₹ ७००, त्रैवार्षिक १०००,
संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.
चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

# संवादकीय

आदरणीय,

गुरूजी

सप्रेम नमस्कार.

तुमच्या प्रतिक्रीयेची वाट पहात पुन्हा लिहीता झालोय. का? असे वागतात कळतच नाही. उत्तर नका देऊ पण सुचवा तरी. तुमच्याकडे अनुभवाचं मोठ्ठ गाठोडे आहे. त्या अनुभवांचा लाभ आम्हालाही होऊ द्या.

गुरूजी, गावातील बी.एल.ओ.ची जबाबदारी असेल तुमच्यावर. कठीण आहे हो ते काम । सुरवातीच्या काळात कागदोपत्री चाललेला कारभार आता ऑनलाईन झाला आणि घरोघरी फिरून डाटा गोळा करणे जिकीरीचे. त्यात नेट व्यवस्थित चालत नाही. एकदा भरलेली माहिती पुन्हा भरावी लागत असल्याचे कळाले.

तुमचा शिक्षक, संघटनेचा विरोध आहे म्हणे. तरी अशैक्षणिक कामात काही कमी झाल्याचे दिसत नाही. राष्ट्रीय कामाच्या ओझ्याखाली गुरूजींचे शिकवणं मात्र दबलंय.

प्रजासत्ताक दिनाची लगबग चाललेली असतांना निष्ठा प्रशिक्षणे सुरू झाली. अनेकांनी नाके मुरडली. ते का कळलेच नाही. प्रशिक्षणे आवडत नाही की काय? प्रशिक्षणे आवडावीत यासाठी काहीतरी करा अशी मागणी नव्या सरकारकडे करावी म्हणतो.

गुरूजी, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण राबले पाहिजे. आपली मातृभाषा आहे ती. टिकायला हवी बोलणाऱ्यांचा टक्का वाढायला हवा. भाषेतही शुद्धता असावी. तरीच मराठी भाषा दिनालाच माय मराठीचा कंठ आवळतांना बरीच मंडळी दिसते आणि त्यांचीच मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल झालेली पाहिली. आपण गुरूजी, सर असलो तरी आपल्या मुलांच्या शाळा प्रवेशावेळी आपण गोंधळतो. इंग्रजी कि मराठी या माध्यमांच्या प्रवेशाचा गुंता का सुटत नाही? मराठी शाळा का नको? हे कोडे सोडवायला हवे. वास्तविक मराठी शाळांमधून श्रमसंस्कारापासून डिजीटल शिक्षणापर्यंत सारे काही मिळते परंतु या शाळातील शिक्षकांच्या मागे अशैक्षणिक कामांचा ससेमिरा कमी करायला हवा.

गुरूजी, शिक्षणयात्री मासिकातील आनंदाचं झाड आवर्जून वाचायला हवं. शिक्षक आणि विद्यार्थ्यातील नात्यांची वीण उलगडते. शिक्षकाच्या आजन्म गुरूकूल असण्याचं भान आनंदचं झाड देतं. शाळेतील छोट्या अनुभवांनी अनभवसमृद्ध भावविश्व समजण्यास मदत होते. म्हणूनच तुम्ही, सर्व शिक्षकांना आनंदाचं झाड वाचायला सांगा.

या अंकापासून आम्ही आहोतच वेगळे या सदरातून वैशिष्ट्यपुर्ण सजीवांची ओळख करून देणारे आहोत. विद्यार्थ्यांना वाचून दाखवा. त्यांना नवनवीन सजीवांची माहिती घेऊ द्या. तेवढंच परिसरातील सजीवांचा  परिचय होईल. ! तुर्तास इतकेच .

आपला

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर ‘शिक्षणयात्री’ या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.



**विजय पांढरीपांडे**
हैदराबाद
७६५९०८४५५५

# अनुभवाचे बोल

आज मागे वळून पाहतांना मनात कृतकृत्य झाल्याची, समाधानाची भावना आहे. कसलीही खंत नाही, कुणाविरूध्द तक्रार नाही, कसलाही अभाव नाही, कुठेही निराशेचा भाव नाही. माणसाला जे जे हवे असते ते सारे किंबहुना अपेक्षेपेक्षा जास्त वेळीच किंवा वेळेपूर्वीच मिळाले की ही परिपूर्णता लाभते-आयुष्याला.

माझ्या आयुष्यातील सात दशकांपैकी चार दशकांपेक्षाचा अधिक काळ हा अध्ययन, अध्यापन संशोधनात गेला. ज्या विद्यापीठाने गेल्या वर्षी शतकी महोत्सव साजरा केला त्या उस्मानिया विद्यापीठात मी प्राध्यापक (फुल टाईम प्रोफेसर) ह्या नात्याने अर्धेअधिक आयुष्य योगदान दिले ह्याचा सार्थ अभिमान वाटतो. इथे (हैद्राबादला) येण्यापूर्वी आय.आय.टी त घालवलेले एक दशक हा माझा खऱ्या अर्थाने पायाभरणीचा, जडणघडणीचा काळ. तिथल्या भीष्म पितामहांच्या मार्गदर्शनाखाली गिरविलेले धडे पुढे आयुष्यभर सर्वार्थाने उपयोगी पडले. मैलाचे दगड ठरले. आयुष्यात सर्वार्थाने यशस्वी होण्यासाठी परिश्रमाला, प्रामाणिक प्रयत्नांना कुठलाही पर्याय नाही हे मला आय. आय टीच्या महागुरूंनी शिकविले. त्यांचे ऋण शब्दांपलीकडचे.

उत्तम शिक्षक होणे ही एक तपश्चर्या असते. साधना असते. ज्या मायक्रोवेव्ह अन् रडार इंजिनियरिंगमध्ये मी तीन चार दशके अध्यापन अन् थोडेफार संशोधन केले त्या विषयाचा आय.आय.टीत पाऊल ठेवण्यापूर्वी फारसा गंध नव्हता. त्यामुळे ह्या विषयाचे थिअरी अन प्रयोगाचे सर्व पायाभूत धडे आय. आय. टी च्या भीष्म पितामहांनी माझ्याकडून गिरवून घेतले. एखाद्या संगीत घराण्यात गायनाचार्य पंडित जशी नवख्या शिष्याकडून एखादी चीज अनेक वेळ घोकून घेतात, त्या पध्दतीचे गुरूशरण शिक्षण मला लाभले. अशा साधनेला फार पेशन्स लगतो. तपश्चर्या लागते. हे अक्षरश: लोखंडाचे चणे खाण्यासारखे दिव्य असते. आजच्या पिढीत,बहुतांशी प्रमाणात हा पेशन्स ही तपश्चर्या आढळून येत नाही. ह्या विधानाला अपवाद आहेतच. पण ती संख्या फार कमी. परिश्रमाला पर्याय नाही हे युवा पिढीने समजून घेतले पाहिजे.

तुमचे शिक्षण, तुम्हाल लाभलेले शिक्षक, ज्या वातावरणात तुमची वाढ होते ती संस्था, तो परिसर, तुमची साथ-संगत, तुमचे वाचन, ह्या सर्वांतून लाभलेले संस्कार हेच तुमच्या व्यक्तिमावाच्या जडण घडणीसाठी कारणीभूत असतात. मी ज्या संस्थेत खऱ्या अर्थाने घडलो त्या आय. आय. टी खरगपूरचे नाव सर्वप्रथम अभिमानाने सांगतो. त्या संस्थेच्या तेथील ऋषीतुल्य प्राध्यापंकाच्या आठवणीने आजही भारावून भरभरून बोलतो.

आय.आय.टी. खरगपूर नंतर ज्या उस्मानिया विद्यापीठात माझ्या संशोधनाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली, माझ्या अध्यापनाल गती मिळाली. त्या विद्यापीठाचे, तेथील ज्येष्ठ सहकाऱ्याचे ऋण मानतांना मी विनम्र होतो. भावविवश होतो. आपण घेण्याचा विचार करण्याआधी विचार केला पाहिजे. मग आपल्या योग्यतेनुसार आपल्याला हवे ते वेळेवर किंबहुना वेळे आधी सुद्धा मिळतेच. मला ते मिळाले त्यासाठी माझ्या मनात नेहमीच कृतज्ञभाव आहे.

आपण आपले काम निष्ठेने, श्रध्देने करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे. कुठेही 'चलता है' टाईप कॅज्युअल अप्रोच नको. मी जे काही करेन ते उत्कृष्ठच करेन हा गुणवत्तेविषयीचा आग्रह फार महत्त्वाचा असतो. यश संपादनाच्या दृष्टीने, आपण अनेकदा निवड करतांना आपली व्यक्तिगत सोय बघतो.

सोपा मार्ग निवडला हे चुकीचे. सोयीपेक्षा, सोप्या मार्गापेक्षा योग्य मार्ग कोणता हा विचार जास्त योग्य.. म्हणजे कनव्हिनियंट चॉईस पेक्षा राईट चॉईस महत्त्वाचा.

आजकाल खोटेपणा केल्याशिवाय, वाकडी वाट चालल्या शिवाय काही मिळत नाही हा प्रवाद वाढीला लागलाय. ह्यासाठी राजकारणी पुढाऱ्यांची (उज्जास्पद) उदाहरणं दिली जातात. ते वाममार्गाने वर चढले, धनवान झांले ते खरे असले तरी ते सुखी समाधानी आहेत कां हा

प्रश्न आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाचे समाधान हेच शाश्वत सुख असते. खोटेपणाने सत्ता संपत्ती कमावणारी माणसे नेहमी तणावग्रस्त असता. त्यांच्या मनात कुठेतरी भीती असते. कोण कधी काय उकरून काढेल. ह्या विचाराने ते , भयग्रस्त असतात. शिवाय वाममार्गाने मिळालेले यश पचवायला कठीण असते. ते उलट तुमच्या आत्मविश्वसाला पोखरत असते. तुम्हांल आतून दुबळे करणारे ठरते. लाखो करोडो कमावणारे सिनेकलावंत निरोशेने ग्रासलेले, व्यसनाच्या आहारी गेलेले आपण बघतो. कोणे एके काळी प्रसिध्दीच्या शिखरावर असलेले, लाखो अनुयायांचे चाहते बाबा, महाराज तुरूंगाची हवा खातांना आपण बघतोच. पैशाची अफ रातफ र करून जनतेला फसवणारे मोठमोठे व्यावसायिक देखील अटकेच्या भीतीने पळून जातात अन् वेळ आली की गजाआड जातात हे दिसतेच आहे.

आपल्या संस्कृतीचे सर्वोकृष्ट बोधवचन म्हणजे सत्यम शिवम सुंदरम जीवन कसे असावे, कसे जगावे ह्याचे सार ह्या त्रिसुत्रीत सामावले आहे. सत्याचा संबंध बुध्दीशी, विवेकाशी काय योग्य, काय अयोग्य हे पारखण्यासाठी शिवमचा संबंध पावित्र्याशी, शुध्दतेशी, तसेच अचुकतेशी देखील शास्त्राने सिध्द करता येईल अशी अचुक वैचारिक प्रणाली. सुदंर म्हणजे आकर्षित करणारे. पुन:पुन: अनुभवाने से वाटणारे. ज्यात कृत्रिमता नाही असे-थोडक्यात नैसर्गिक, निसर्गाशी जवळीक साधणारे. आपण साधारणपणे निसर्गाच्या विरोधात जादू शकत नाही. कारण ते स्वयंसिध्द असते. तिथे वेगळ्या प्रमाणाची, सिध्दतेची गरज नसते.

तेव्हा सत्यम शिवम सुंदरम ही त्रिसुत्री आपण ध्यानात ठेवली, अंगिकारली तरी खूप काही साध्य होऊ शकते. कुणीही शत प्रतिशत परफेक्ट असू शकत नाही. होऊ शकत नाही. पण आपण त्या दिशेने प्रयत्न मात्र करू शकते.

सुदैवाने इंजिनियरिंग च्या अध्यापन संशोधन च्या सोबतीने चांगल्या साहित्याने, उत्तम वाचनाने अन् लेखनाच्या छंदाने देखील मला खूप काही दिले, शिकवले. सर्वार्थाने श्रीमंत,समृध्द केले. रूढार्थाने मी स्वत:ला साहित्यिक समजत नाही. मी छंदिष्ट लेखक आहे. आवड म्हणून, माझी स्वत:ची अभिव्यक्ती गरज म्हणून मी लिहितो. ह्या लेखनाने वाचकांना मिळला! आंनद हा लेखनाचा नैसर्गिक बायप्रॉडक़्ट! माझी उस्मानिया दिद्यापीठातील वर्षे अन् प्रकाशित पुस्तकांची संख्या जवळपास सारखी हाही एक योगायोग. वाचना लेखनाच्या छंदामुळे मला इंजिनियरिंगच्या सोबतीने माणसांच्या देखील अभ्यास करता आल. चुकांकडे शिकवण्याची संधी म्हणून बघण्याचा दृष्टिकोन मिळाल. काय करावे ह्याबरोबर काय करू नये ही जाणं देखील तितकीच महत्त्वाची, किंबहुना जास्त महत्वाची.

आयुष्याचे गणित आपण समजतो तितके कठीण नसते. इंजिनियरिंगच्या शिक्षणात प्रत्येक समस्येचे उत्तर असतेच. एक नव्हे अनेक उत्तरे. आपण आपल्याला योग्य ते उत्तर शोधायचे !

**गौरव मराठीचा...**

माझ्या मराठीची गोडी । मला वाटते अवीट ।।
माझ्या मराठीचा छंद । मना नित्य मोहवीत ।।

**-वि.म.कुलकर्णी**

भाषा आमुची छान। मराठी । भाषा आमुची छान ।
भाषा भिन्न देशदेशच्या सर्वांची परि खाण।। मराठी ।।

**-ना.के.बेहेरे**

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य एक तो मराठी
धर्म,पंथ,जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

**-सुरेश भट**





**मिलिंद कल्याणकर**
नेरूळ, नवी मुंबई
९८१९१५५३१८

# मातृभाषेच्या संवर्धनासाठी ...

अमृताशी पैजा जिंकणारी तसेच ज्ञानेश्वर माऊलीने संपन्न व समृद्ध केलेली अशी ही महाराष्ट्राची बोली अर्थात आपली माय मराठी. प्रत्येक भाषेचे स्वतःचे असे एक सौन्दर्य असते. स्वतःची एक वेगळी ओळख असते. याला मराठीही अपवाद नाही. संत साहित्य, ललित साहित्य, काव्य इत्यादी साहित्य प्रकारांची महाराष्ट्रात म्हणजेच मराठी भाषेत मोठ्या प्रमाणात रेलचेल आहे. काळाच्या ओघात तावून सुलाखून निघालेले साहित्य व त्या साहित्याची निर्मिती करणारे शब्दांचे किमयागार तसेच भाषाप्रभू यांची थोर परंपरा आपल्या मराठीस लाभली आहे. महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेले हे सर्व साहित्य व त्यातल्या त्यात संत साहित्य हे मराठी भाषेच्या सागरात विहरणाऱ्या साहित्यिकांना दीपस्तंभासारखे मार्ग दाखविणारे आहे. मराठी भाषेप्रमाणेच इतर भाषांतील साहित्य प्रथितयश साहित्यिकांनी मराठी भाषेत अनुवादित करून मराठी भाषा अधिकाधिक संपन्न / समृद्ध करण्यास हातभार लावला आहे. भाषा शब्दप्रभूंनी मराठी तसेच इतर भाषेतील अजरामर साहित्यकृती अनुवादित करून आपली दर्जेदार व सकस साहित्य वाचनाची भूक वाढवली व वाढवीत आहेत.

या सर्व गोष्टींमुळे मराठी भाषेला आपला असा एक आगळा वेगळा चेहरा मोहरा प्राप्त झाला आहे. प्रथितयश साहित्यिकांबरोबरच काही नवोदित साहित्यिकही आपल्या दर्जेदार साहित्याने एक वेगळा ठसा उमटवित आहेत. काळाबरोबर माणसाची विचार करावयाची पद्धत बदलू शकते या नव्या विचाराने प्रेरीत होऊन काही साहित्यिक नित्य नवीन प्रवाह देऊन आपली विचार करण्याची प्रवृत्ती वाढवित आहेत. ख्यातनाम तसेच प्रथितयश साहित्यिकांचे विचार व नवोदित साहित्यिकांचे विचार आपल्याला वाचावयास मिळाल्यामुळे वाचकांची सदृसदविवेकबुद्धी जागृत होऊन विचार करण्याची प्रवृत्ती जास्त प्रगल्भ होऊ लागली आहे. इतर भाषांप्रमाणेच मराठी भाषा आपण कशी बोलतो अथवा मराठीत आपण कसे लिखाण करतो यावर त्या भाषेचे सौन्दर्य अवलंबून असते. लिहिताना किंवा बोलताना आपण जे शब्द वापरतो त्यावरून आपण करत असलेल्या विचार प्रणालीचे आकलन होते. आपल्या बोलण्यातून अथवा लिहिण्यातून आपले शिक्षण आपले संस्कार अथवा आपला विचार करण्याचा आवाका किंवा वैचारिक क्षमता / श्रीमंती याचे प्रतिबिंब दिसत असते. कठीण व जड तसेच कारण नसतांना अलंकारिक शब्द वापरून ते सर्वांना कळतीलच याची ग्वाही देता येणे शक्य नाही. साध्या सोप्या शब्दांनी नटलेली भाषाच चांगल्या तऱ्हेने संवाद साधू शकते अथवा असेही म्हणता येईल की सोप्या शब्दांनीच आपल्या मनातील विचार समोरील व्यक्तीला चांगल्या तऱ्हेने आकलन होऊ शकतात.

बोली भाषा ही नेहमीच सुलभपणे संवाद साधण्यासाठी असते. साधे सोपे स्वच्छ व सरळ अर्थ निघणारे शब्द वापरून केलेला संवाद हा चांगलाच परिणामकारक होऊ शकतो. नेमका अर्थ ध्वनीत करणारे शब्द वापरून संवाद साधल्यास तो सुसंवादच होतो व त्या योगे आपल्या विचारांचे अवलोकन करण्यास समोरील व्यक्तीस प्रयास पडत नाही. मराठी भाषा वापरताना आजूबाजूच्या परिस्थितीचे भान ठेवावे लागते. मराठी भाषेवर इतर भाषांचा प्रभाव पडू लागला आहे. हे सांगण्याचे कारण एवढेच की आजूबाजूची परिस्थिती मराठी भाषा धार्जिणी असूनही मराठी जास्त बोलले जात नाही किंवा नाईलाजाने बोलले जाते. अशा परिस्थितीत मराठी भाषा जिवंत ठेवणे आणि त्या भाषेस उर्जितावस्था आणण्याचा प्रयत्न करणे हे आपल्या सर्वांचे प्रथम कर्तव्य आहे. आपल्या मायबोलीला आपण मनापासून जपले पाहिजे. मायबोलीला क्षीण होण्यापासून जपणे आपले सर्वांचे हे पहिले कर्तव्य आहे. मराठी भाषेचा पहिला शत्रू मराठी भाषिकच आहे. मराठीची उपेक्षा करणारी ही माणसे मराठीचा उपयोग पार्टीत किंवा डिनर घेताना तोंडी लावण्याचा पदार्थ म्हणून करतात व आपण मराठीतूनच बोलले पाहिजे हे इंग्रजीतून किंवा हिंदीतून ठणकवितात. हे जे तथाकथित मराठी भाषेचे

भोक्ते असतात त्यांना आम्हाला मराठीच सो सो च येते असे ज्याला त्याला सांगण्यात मोठा अभिमान वाटतो. इतर भाषांच्या अतिक्रमणापासून आपण आपल्या भाषेला जपले पाहिजे. हे सर्व फक्त आपण सर्वजण मिळून करू शकतो.

आपल्या मायमराठीची आजकाल का पीछेहाट होत आहे याची कारणे शोधलीच पाहिजेत. आम्हाला मराठी नीट येत नाही किंवा आम्हाला मराठी सो सो च येतं असे अभिमानाने बोलणारी महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेली व मराठी संस्कृतीत वाढलेली भरपूर माणसे मिळतील. आजकाल अशी परिस्थिती आहे की कित्येक वेळा तसेच कित्येक ठिकाणी मराठी मातृभाषा असलेली माणसे एकमेकाला भेटली की ते मराठीत संवाद न साधता हिंदी भाषेत संवाद साधण्यास प्राधान्य देतात. हे असे का घडते किंवा ते असा का संवाद साधतात किंवा त्यांना मराठीचा एवढा का तिटकारा आहे यावर विचार मंथन झाले पाहिजे. प्रथम आपण आपली मराठी संस्कृती / भाषा जपली पाहिजे तरच पुढच्या पिढीवर त्याचे परिणाम होतील. कटाक्षाने मराठी बोलायचे असा आपण पण केला तर काहीच अशक्य नाही. असेही नाही की मराठी भाषेचाच वापर आपल्या दैनंदिन सर्व व्यवहारात करावयाचा. आंतरराष्ट्रीय भाषा म्हणजे इंग्रजीही आली पाहिजे व राष्ट्रभाषा म्हणून हिंदीही आली पाहिजे. मराठी भाषा बोलतांना इंग्रजी / हिंदी शब्दांचा वापर शक्यतो टाळून ती धेडगुजरी होणार नाही याची काळजी घेतली तर मराठी भाषेचे भरजरीपण प्रकर्षाने जाणवेल. मराठी / इंग्रजी /हिंदी भाषा नीट समजून घेऊन बोलली तर त्या भाषेचे आकलन व्यवस्थित होते. याचे उत्तम उदाहरण मराठी व इंग्रजी साम्य. बालपणी / लहानपणी कावळ्याची ओळख 'काऊ' म्हणून करून दिली. पण इंग्रजी शाळेत गेल्यावर बालपणीचा दोन पायाचा 'काऊ' चार पायाचा कसा होतो हा प्रश्न पडत असावा. त्याकरिताच मराठी भाषेबरोबरच इंग्रजी / हिंदी भाषेची जुजबी का होईना पण ओळख होणे गरजेचे आहे. आपल्या मुलांना मराठी भाषा प्रामुख्याने शिकवलीच पाहिजे. कधी कधी लहान मुलांना आपण विचारून जातो 'माकडाला इंग्रजीत काय म्हणतात' तेव्हा नकळतपणे त्याच्यावरील मराठी भाषेचा पगडा आपण मान्य करतो. सुरुवातीला इंग्रजी मुळाक्षरे शिकविताना आपण मराठी भाषेचा आधार घेतो आणि आपण काही चुकीचे करीत आहोत असे वाटत नाही. इंग्रजी / हिंदी शिकविताना मराठी भाषेचा उपयोग केला जातो कारण मातृभाषेतून समजविल्याने इंग्रजी / हिंदी भाषेचे आकलन होण्यास सोपे जाते. मातृभाषा पक्की असेल तर इतर भाषा शिकण्यास अडचण येत नाही. इतर भाषांच्या अतिक्रमणापासून मराठी मायभाषा / मायबोली आपणच जपली पाहिजे. याबाबतीत मला आलेला अनुभव बोलका आहे. नुकताच मी मराठी पुस्तकांच्या पुस्तक जत्रेला गेलो होतो व साहजिकच तिथे फक्त मराठी पुस्तकेच होती त्यामुळे साहजिकच सर्वजण मराठी भाषिकच असणार. मी पुस्तके बघत असताना एक तरुण मला एक्सक्युज मी अंकल म्हणाला व तो पुढे गेला. यावरून एक गोष्ट लक्षात येते की मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे अतिक्रमण का होत आहे याचा विचार झाला पाहिजे. वास्तविक त्याने हे मराठीतून बोलावयास हवे होते. पण त्याने इंग्रजीचा आग्रह धरला. इतर भाषा आणि प्रामुख्याने इंग्रजी भाषा बोलता येणे हे वाईट नाही किंबहुना इंग्रजीही लिहिता वाचता आलीच पाहिजे. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असल्यामुळे ती शिकणे गरजेचे आहे व तीही आली पाहिज पण म्हणून मातृभाषेकडे पाठ फिरवता कामा नये. माझा या बाबतीत जरा वेगळा अनुभव आहे. माझा एक स्नेही तेलगू भाषिक आहे पण माझ्याशी बोलतांना ते कटाक्षाने मराठी बोलतात. इतर भाषिक जर मराठी बोलू शकतात तर मराठी भाषिकांना मराठी बोलायला लाज का वाटते.

आजकाल काही प्रमाणात पालकांच्या कडूनही भाषेच्या बाबतीत थोडे दुर्लक्ष होते. घरात मातृभाषेचे म्हणजेच मायमराठीचे वातावरण असते. त्यामुळे साहजिकच घरात प्रामुख्याने मराठी बोलले जात असणारच. पण हेही लक्षात ठेवणे गरजेचे आहे की मुलांचे मित्र मराठी बोलणारे असतीलच असे नाही. इतर भाषा बोलणाऱ्या मित्र-मैत्रिणी असतील. त्यामुळे साहजिकच त्यांचा संवाद राष्ट्रभाषा हिंदीतून होणे स्वाभाविकच आहे. त्यामुळे त्यांना हिंदीतून बोलायची सवय लागते. त्याचा परिणाम असा होतो की ते घरातील मंडळींशीही हिंदीतून बोलतात व काही

प्रमाणात पालकही त्याकडे दुर्लक्ष करतात. त्या मुलांना वेळीच जर समज दिली की घरात हिंदी न बोलता मराठी बोलत जा व तसा नुसता आग्रह न धरता सक्ती केली तर मराठी भाषा नक्कीच वैभवशाली होईल. कमीतकमी मराठी माध्यमाच्या शाळांनी तरी मराठमोळ्या सणांचे महत्व मुलांच्या मनावर बिंबविले पाहिजे. सणांची माहिती त्या त्या दिवशी फलकावर लिहून मुलांच्या मनात मराठी भाषेबद्दल प्रेम निर्माण करणे गरजेचे आहे. इतर सणांचीही माहिती हवीच पण मराठमोळ्या सणांची माहिती प्राधान्याने हवी. परीक्षेत सुद्धा निबंधाचे विषय मराठमोळ्या सणांच्या तसेच मराठमोळ्या संस्कृतीच्या संबंधित असावेत. यामुळे मुलांच्या मनात मराठी भाषा व संस्कृती याबद्दल आपलेपणा नकळत निर्माण होईल. मी दादरमधील बालमोहन विद्यामंदिर या प्रथितयश शाळेत शिकलो आहे. प्रत्येक सणाच्या दिवशी किंवा आदल्या दिवशी त्या सणाची इत्यंभूत माहिती शाळेच्या इमारतीत प्रवेश करतांना असलेल्या फळ्यावर मराठीत सुवाच्य अक्षरात लिहिलेली असायची. त्यामुळे शालेय काळातच त्या त्या सणांची माहिती नकळत आमच्या मनावर कोरली गेली. आमचे शिक्षकवर्गही अभ्यासाच्या बरोबरीने त्या त्या सणांचे महत्व व त्या संदर्भातील माहिती आमच्या मनावर बिंबवीत असत. कधी कधी मराठीतून काही प्रतिष्ठित व्यक्तिमत्वाचे व्यक्तिविशेष फळ्यावर मराठीतून लिहिले जायचे. त्यामुळे साहजिकच आमचा मराठी भाषेचा शब्दसंग्रह वाढत गेला व आम्हाला त्याचा खूप उपयोग झाला. त्याचप्रमाणे प्रत्येकाच्या वाढदिवसाच्या दिवशी फळ्यावर आजचा वाढदिवस या शीर्षकाखाली त्या विद्यार्थ्यांचे / विद्यार्थिनीचे नाव मराठीत लिहिण्याची प्रथा अजूनही सुरु आहे. आपले नाव फळ्यावर मराठीत झळकले याचे वेगळेच अप्रूप त्या वयात होते. त्यामुळे नकळतच मराठी भाषेबद्दल प्रेम वाढीस लागले. गेल्या काही वर्षांपासून सरकारी / शासकीय कामात कटाक्षाने मराठीचा वापर होत आहे. परिपत्रके, शासकीय आदेश इत्यादी मराठीतच काढले जातात. वाचन, लेखन, श्रवण याद्वारे मराठीचा आपल्या मराठीचा प्रसार होत आहे. मनन / चिंतन याद्वारे मराठीला उर्जितावस्था येणार हे नक्की. आपण पुस्तके वाचतो, वर्तमानपत्रे वाचतो तसेच इतरही छापील साहित्य वाचतो पण मुळात कोणीतरी ते लिहिलेले असते. याचाच अर्थ कोणीतरी हे पुस्तक लिहिलेले असते. यावरून एक लक्षात येते की कोणीतरी मराठीच्या संवर्धनासाठी प्रयत्न करीत आहे. मग तो प्रयत्न आपणच का नाही करायचा हा विचार मनात येतो तेव्हाच मराठीची आगेकूच होणार याची मनोमन खात्री पटते.

व्यक्ती म्हणून देखील प्रत्येकाने मराठी भाषेचा जास्तीतजास्त वापर केला तर मराठीला वैभवशाली काळ येण्यास काहीच अडचण राहाणार नाही. साधे दूरध्वनीवरून बोलतांना आपण बोलण्याची सुरुवात मराठीतून केली तर समोरून बोलणारा मराठीतुन बोलण्याचा नक्की प्रयत्न करेल. ही काही तात्काळ होणारी गोष्ट नाही पण मराठीच्या प्रसारासाठी त्याचा नक्कीच फायदा होईल. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे मराठी लिखाण. आज मराठी लिखाण करण्याचे प्रमाण खूप कमी आहे. मी साधारणतः २००८ पासून संगणकावर मराठी टंकलेखन करीत आहे. त्याआधी जवळ जवळ १० ते १२ वर्ष मी लेख आणि कविता स्वहस्ताक्षरात लिहीत होतो. पण जर तुलना केली तर संगणकावर टंकलेखन करणे सोयीचे असते पण स्वहस्ताक्षरात लिहिण्यात जी मजा होती ती औरच होती. मराठी भाषिकांनी जर कटाक्षाने मराठी लिहिण्याचे ठरविले तर मराठीवर जमलेली धूळ उडून जाऊन स्वच्छ व सुंदर मराठीचा प्रत्यय नक्कीच येईल. काही अपवादात्मक शब्द सोडले तर इंग्रजीतील प्रत्येक शब्दाला मराठी प्रतिशब्द आहेच.

मातृभाषेत बोलण्याची खुमारी ही फक्त मातृभाषेत संवाद साधणाऱ्यालाच कळू शकते. महाराष्ट्रात राहून मराठी बोलणे जेवढे संयुक्तिक आहे तेवढेच मराठी बोलता न येणे हे लाजिरवाणे आहे. मराठी जतन करणे जेवढे गरजेचे आहे तेवढेच मराठी वाढविणेही निकडीचे आहे. मराठी भाषा बोलणे ही एक कला आहे पण ती सहजसाध्य नाही. त्यावर प्रेम केले तरच ती साध्य होते. अपरिचिताशी बोलताना हिंदी किंवा इंग्रजी वापरणे ठीक वाटते पण महाराष्ट्रात जन्मलेल्या मराठी माणसाने मराठीचा वापर कटाक्षाने आपल्या संवादात करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच

महाराष्ट्रात राहण्याऱ्या परप्रांतीयाने देखील कमीतकमी मराठी बोलीभाषा तरी आत्मसात केलीच पाहिजे. मराठी भाषिकही परप्रांतात गेले तर ते तेथील बोलीभाषा / त्यांची मातृभाषा बोलण्याचा प्रयत्न करतात मग परप्रांतीय आपल्याकडे आल्यावर मराठी भाषा शिकलीच पाहिजे. कोणतीही भाषा बोलताना चुका होणारच व ते स्वाभाविकच आहे. मग मराठी भाषा बोलताना चूक झाली तर काहीही बिघडत नाही. त्या चुकांमधूनच भाषा अवगत होण्यास मदत होते. मराठी भाषा बोलताना होत असलेल्या चुका जाणीवपूर्वक तसेच मनापासून सुधारण्याचा प्रयत्न केल्यास फरक पडू शकतो व मराठी चांगले लिहिण्या, वाचण्यास व बोलण्यास येऊ शकते. अलंकारिक शब्दांने भाषेचा गोडवा वाढतो हे जरी खरे असले तरी रोजच्या संवादाच्या भाषेत अलंकारिक शब्द वापरावेतच असे काही नाही. सोपे तसेच सहज आकलन होणारे शब्द वापरूनही आपण आपल्या भाषेत आपले विचार मांडू शकतो व संवादाचा परिणाम साधू शकतो. महाराष्ट्रात स्थायिक असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस मराठी आलीच पाहिजे. आपल्या मराठीची शान आपणच राखू शकतो व ते आपले प्रथम कर्तव्य आहे.

## शिक्षणवार्ता...

# वर्ग तिसरी...११ मिनिटे...२४८ समीकरणे सोडविणारा शिरपुरचा प्रणव...

शिरपूर सिप abacus च्या नुकत्याच चेन्नई येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शिरपुरच्या तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या प्रणव मनोजकुमार गोड या विद्यार्थ्याने एकूण ११ मिनिटात २४८ समीकरणे सोडवीत चेन्नई येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला, तर शिरपुरच्याच दयाशील तुषार बैसाणे या दहावीच्या विद्यार्थ्याने एकूण ११ मिनिटात सातव्या लेवल मध्ये एकूण२५५समिकरणे सोडवीत तृतीय क्रमांक पटकाविला.देशातील अनेक चाचण्यामध्ये गणित विषयात विद्यार्थ्याचे निकाल खालावत आहेत , बऱ्याच विद्यार्थ्यांना सोप्या-सोप्या बेरीज , वजाबाकी , गुणाकार व भागाकारसोडविता येत नाही परंतु सिप abacus कार्यक्रमाद्वारे प्रशिक्षित विद्यार्थी केवळ ११ मिनिटात एकाग्रता व वेगाच्या साह्याने शालेय स्तरावरच आंतर राष्ट्रीय स्पर्धेत यश संपादन करीत असल्याने भविष्यातील अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये हे विद्यार्थी उज्वल यश प्राप्त करतील स्पर्धेत ८ देशातील ४००० विद्यार्थी सहभागी झाले होते. शिरपुरच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील २ तर राष्ट्रीय स्तरावरील ५ पारितोषिके पटकावीत खानदेश विभागात अव्वल बक्षिसे पटकाविण्याचा बहुमान पुन्हा एकदा शिरपुर केंद्राने पटकाविला.

चेन्नई ट्रेडसेंटर येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन प्रसिद्ध शास्त्रज्ञ चांद्रयान- २ मोहिमेचे संचालक जयप्रकाश होते यावेळी मलेशिया येथील केल्विन हिरा दिनेश विक्टर व सिप abacus च्या ८ देशांचे प्रमुख उपस्थित होते.

राष्ट्रीय स्पर्धेतील विजेते चतुर्थ लेवल निरंजन जगदीश ठाकरे , सहावी लेवल मिहीत अमित बिडे , सुशांत तुषार बैसाणे यांनी यश संपादन केले. स्पर्धेतील यशस्वी विध्यार्थ्यांना परफेक्ट अकॅडेमीचे संचालक जयेश शाह , सुचिता शाह . अपर्णा गुप्ता , छाया पारीख , प्रीती शाह , सुचिता पाटील , मनीषा मराठे , विभा गुजराथी , कविता पाटील , नेहा शाह , स्वाती पाटील , भावना हासवाणी , पूनम पाटील , संगिता बाविस्कर , अंजली वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.





**अब्दुल कय्यूम बशीर**
सर सैय्यद गर्ल्स हायस्कूल
शहादा जि.नंदुरबार ९४०३०८७८१६

# बोलू कौतुके मराठी ...

जागतिक मराठी भाषा गौरव दिवस २७ फेब्रुवारी. हा मराठी साहित्याचा मान बिंदू (मानंदड) वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिन 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून साजरा करतो. त्यांचे पूर्ण नाव विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज जीवन काल २७ फेब्रुवारी १९१२ ते १० मार्च १९९९. जन्म पुणे येथील. कुसुमाग्रज या नावाने काव्य लेखन केले. एक श्रेष्ठ मराठी कवी, नाटककार व कांदबरीकार. जीवनलहरी, किनारा, मराठी माती, वादळवेल इत्यादी त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह. विशाखा हा काव्यसंग्रह मराठी आधुनिक काव्यांचे कायमचे भूषण आहे. सन १९७४ मध्ये 'नटसम्राट' ह्या नाटकाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. सन १९६४ मधील गोवा येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मराठी साहित्य रचनेत त्यांचे योगदान मौल्यवान आहे.

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषा कुलातील एक भाषा आहे. भारत देशातील बावीस भाषांपैकी मराठी एक आहे. महाराष्ट्र आणि गोवा ह्या राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील पंधरावी व भारतातील चौथी भाषा आहे. मराठी बोलण्यांची एकूण लोकसंख्या सध्यातरी ९,००,००,००० पेक्षा जास्त आणि उत्तरोत्तर वाढत आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृत मधून निर्माण झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांमधून झाली आहे.

आज उद्या एखादा दिवस, उत्सव साजरा करणे आपल्याला खूप सोपं होत चाललंय........ मात्र सांगावे लागते की आपण खरोखर मराठी भाषा टिकून राहावी म्हणून काही प्रयत्न करीत आहोत का? आणि करायला हवेत तर ते कोणते? कशा प्रकारे. शिक्षण क्षेत्रातही मराठी माध्यम शाळांच्या तुलनेत इंग्रजी माध्यम व सध्यातरी सेमी इंग्रजी शाळा आल्यात म्हणजे एका तऱ्हेने मराठी, माध्यम शाळांची दमछाक होतांना दिसते आहे. याला आपण कारणींभूत आहोत. आपण संवेदन शुन्य होत विसरत चालले. आहे की आपली भाषा ही जगातल्या भाषांसमोर, त्यांच्या रेट्यासमोर तिच्या हक्कांपासून वंचित होत आहे. आपल्याच भाषेपासून आपण लांब जात आहोत. सकाळचा चहा घेतांना आपण म्हणतो,'मॉर्निंग टी'घरात आपाल्यावर म्हणतो, पेपर आला का? वर्तमानपत्र वा वृत्तपत्र आलं का? असं आपण कुणी म्हणत नाही. म्हणजे पश्चिमात्य भाषेचा पगडा खूपच घट्ट बसला आहे. कुर्ता पायजमा सलवार-कमीज सध्या तरी बोलायला दुर्मिळ होत चालले आहे. या ऐवजी आपणं कोणते इंग्रजी शब्द उच्चरतो. आपल्याला इंग्रजी सारख्या भाषेचा द्वेष करायचा. नाही: त्याबरोबर त्याचे ज्ञान ही मिळवायचे मात्र त्याच बरोबर समानतेने आपली भाषा समृध्द करायची. तिचा वापर प्रसार-प्रचार करायचा. मराठी भाषा शुध्दतेला आपण पारखे होत आहोत.

आजचे युग माहिती तंत्र ज्ञानाचे युग मानले जाते. संपर्क क्रांतीचे युग मानले जाते. अशा वेळी आपण आपल्या दैंनदिन जीवनात छोट्या -छोट्या कृतींनी काहीच नाही का करू शकणार? जरूर आपण करू शकतो. भाषेचे जाज्वल्य नाही तर किमान कमीत कमी मनस्वी अभिमानातून आपण एखादी तरी कृती फुलं विण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कोणतेही चांगले कार्य, रचानात्मक काम आपण स्वत:हून सुरू करावे. शाळेत मुलांना युनिफॉर्म ऐवजी गणवेशात येण्याचीही ताकीद करावी होमवर्क करून आणा त्याऐवजी गृहपाठ करून या असे सांगितले तर त्याचे आपल्याला समाधान वाटेल. तसेच भाषेसाठी प्रचार प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांना आपल्या परीने सहकार्य करून हातभार लावावा. हे फारसे अशक्य नाही.

शिक्षकी पेशा तर फारच ज्ञानदानाचा अध्ययन अध्यापनाचा आहे. शिक्षक जरी अध्यापन करीत असतो. मात्र ते आपल्या ज्ञानदानातूनही शिकतच असतो. विदयार्थी समजून ज्ञानार्जनकरीत ज्ञान वितरीत करत राहतो. हिच तळमळ मराठी भाषेबद्दल राखून त्याने आपले कर्तव्य तत्परतेने पार पाडल्यास मराठीच्या प्रचार प्रसारात व मराठी भाषेस मानाचे दिवस आल्याशिवाय राहणार नाही.

दैनंदिन आयुष्यात आपण प्रत्येकजण रोज किमान दहा फोन कॉल (दूरध्वनि बोलणे) हाताळतोच. दहा ही वेळा संभाषणाची सुरूवात 'हॅलो ने करता' सलाम प्रणाम नमस्कार' अशा सुसभ्य शब्दांनी केली तर? त्यामुळे आपले भाषेबद्दलचे प्रेमही व्यक्त होईल. आपण मोबाईल (भ्रमणध्वनी) वरून दहा-पंधरा लघु संदेश (एस.एम.एस) दररोज पाठवित असतो, त्यातले किमान दोन संदेश मराठीतून पाठविले तर? भाषेचा केला जाणारा हा वापर समोरच्यालाही समाधान देऊ शकेल. प्रेरीत करेल. आज आपल्याला सण-उत्सवा निमित्त असणाऱ्या सुट्टया हव्या हव्यशा वाटतात मात्र भारतीय महिने आणि दिनदर्शिका आपल्याला माहिती हवी आणि ते त्याच तीथिनुसार बोलता यायला हवेत. आपण बोललो तर आपले विदयार्थी अनुकरण करतील कारण विदयार्थी अनुकरणप्रिय असतात. शिक्षकांच्या बोलण्याचे त्यांच्यावर प्रभाव पडतो. पालंकापेक्षा विदयार्थी शिक्षकांचे ऐकतात. आपण अध्यापक असल्याने पुस्तक वाचतच असतो. अशा वेळी ठरवून आपण वर्षाकाठी किमान दोन मराठी पुस्तके विकत घेऊन वाचणे ही कृतीसुध्दा सहज जमणारी व भाषेसाठी काही केल्याचा आनंद देणारी ठरू शकेल.

मराठी भाषेला खरोखरंच प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या हेतूने सदा सर्वदा सुगीचे दिवस असण्याकरिता, विदयार्थी प्रिय भाषा बनविण्यासाठी या दिनाचे औचित्य साधून शाळेत शिक्षक मित्रांनी आपल्या स्तरावर शुध्दलेखन, वाचन, कथालेखन, मौखिक लेखन वर्ग निहाय अशा स्पर्धा आयोजित करून विदयार्थ्यांना सहभागी करावे व त्यांना बक्षीसे-प्रमाणपत्र देऊन भाषेला समृध्द करण्याचे मौलीक कार्य केल्यास मराठीच्या खरा-खुरा गोरव तर होईलच त्याबरोबर देशाच्या इतर राज्यात ही जसे कर्नाटक , आध्रंप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आणि देशात व जगात सुध्दा सुगंध पसरेल.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी।<br>
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।।

## शिक्षणवार्ता...

# आरटीई : २५ टक्के कोट्यातून मोफत प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

दुर्बल, वंचित, दिव्यांग घटकातील बालकांना नामांकित खासगी शिक्षण संस्थेत २५ टक्के कोट्यातून मोफत प्रवेश मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पहिल्या टप्प्यात ६ फेब्रुवारीपर्यंत शाळांची नोंदणी होणार असून, ११ ते २९ फेब्रुवारी या दरम्यान पालकांना पाल्याच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावे लागणार आहेत.

शिक्षण हक्क कायद्याने (राईट टु एज्युकेशन अर्थात आरटीई) मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना २५ टक्के मोफत प्रवेश देण्याचे बंधन खासगी शाळांना घालून दिले. दिव्यांग, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा यामागील उदात्त हेतू आहे. प्राथमिक किंवा ज्या प्राथमिक शाळेला पूर्वप्राथमिक वर्ग जोडला असेल अशा शाळेच्या पहिल्या वर्गात एकूण प्रवेशाच्या २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील मोफत प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे.

सन २०१९-२० या वर्षी नोंदणी झालेल्या आरटीई २५ टक्के पात्र शाळांचे आपोआप ऑटो रजिस्ट्रेशन करण्यात येणार आहे. तथापि, सर्व शाळांची पडताळणी ही गटशिक्षणाधिकारी कार्यालय स्तरावरून करण्यात यावी तसेच स्थलांतरीत शाळा, नव्याने अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेल्या शाळा, अल्पसंख्याक शाळा विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत. २१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत आरटीई अंतर्गत शाळांना नोंदणी करावी लागणार आहे. त्यानंतर ११ फेब्रुवारी ते २९ फेब्रुवारी या दरम्यान पालकांना पाल्याच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. पहिली लॉटरी सोडत ११ ते १२ मार्च या दरम्यान काढण्यात येणार आहे. लॉटरीद्वारा प्रवेश मिळालेल्या पालकांना १६ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी करणे आणि शाळेत जाऊन प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. त्यानंतर प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.



**नीला आपटे**
विनोबा आश्रम,गागोदे
९४०५९२४२२७.

# नई तालीम

'गागोदे' हे रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात, डोंगरांच्या कुशीत वसलेले एक टुमदार गाव. १२५ वर्षांपूर्वी ११ सप्टेंबर १८९५ या दिवशी, या गावात एक बाळ जन्मले आणि 'सब भूमी गोपाल की' म्हणत व विश्वशांती 'जय जगत' चा संदेश देत देशभर पायी फिरले. छोट्याश्या विनूचे आचार्य विनोबा झाले. विनोबांनी जीवनभर ज्ञान - भक्ती - कर्मयोगाची, गीतेची शिकवण निष्ठेने आचरणात आणली आणि जसा विचार - तसा आचार आणि उच्चार या न्यायाने, ज्ञानाची मोठी पुंजी अजरामर साहित्याच्या रुपात लोकांना अर्पण केली. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर भाष्य करणारे त्यांचे साहित्य व त्यांचे विचार हे जीवनाचे तत्वज्ञानच म्हणावे लागेल. यामध्ये सर्वोदय, समाजकारण, राजकारण, शिक्षण, आत्मज्ञान, विज्ञान अशा अनेक अंगाने लोकांना विचारी आणि शहाणे करण्याचा निरंतर प्रयत्न विनोबांनी केला. त्यांच्या या प्रचंड ज्ञानसागरातील काही शिक्षण विषयक विचारांचे मोती आज अस्तित्वात असणाऱ्या प्रस्थापित शिक्षण विचार-धाग्यात गुंफून हार तयार करण्याचा, या लेखमालेतून प्रयत्न केला आहे. ११ सप्टेंबर २०१९ रोजी विनोबांचे १२५ वे जयंती वर्ष सुरू होत आहे. वेगवेगळ्या माध्यमातून विनोबांचे वेगवेगळे विचार लोकांपर्यंत जावेत, त्यांच्या विचारांना उजाळा द्यावा व त्याच्या प्रकाशात आजच्या सामाजिक-राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करावी ही आजच्या काळाची गरज आहे.

नई तालीम शिक्षण विचारांची बीजे महात्मा गांधीजींनी पेरली आणि आचार्य विनोबा भावे यांच्या प्रयत्नाने अंकुरित झाली. विनोबा ही बीजे फक्त अंकुरित करून थांबले नाहीत, तर त्यांनी त्याची रोपवाटिकाही सजवून ठेवली, जेणे करून ही रोपे जागोजागी लावून वाढवता येतील आणि उजाड झालेला शैक्षणिक माळ पुन्हा एकदा वृक्षराजीने समृद्ध बनवता येईल. गरज आहे ती या रोपांची लागवड योग्य जागेवर करून त्याची निगराणी राखण्याची आणि ही जबाबदारी अर्थातच आपणा सर्वांची आहे.

साठ-सत्तर वर्षांपूर्वी विनोबांनी मांडलेले शिक्षण विचार हे आजच्या काळातही तितकेच अर्थपूर्ण व महत्त्वाचे वाटतात. विनोबा इतकी चपखल संदर्भ आणि उदाहरणे सांगतात की, तो मुद्दा वाचणाऱ्याला पटल्याशिवाय राहातच नाही. आपल्या लक्षात येते की, आज आपण आदर्श शिक्षण व्यवस्थेविषयी जो काही विचार करतो, बोलतो, तो आधीच विनोबांनी मांडून ठेवलेला आहे. विनोबा शिक्षणाचा समग्र, सर्वंकष विचार मांडतात. अभ्यासक्रम, विद्यार्थी - शिक्षक गुणविशेष, अध्ययन - अध्यापन पद्धती, शिक्षणाची उद्दिष्टे अर्थात, शिक्षण कशाचे, कशासाठी, कुणाचे, कोणाकडून, कधी, अशा सर्वच बाजूंनी ते मांडतात. त्यांचे विचार सर्वार्थाने क्रांतिकारक वाटतात. आज निर्माण झालेल्या पर्यावरण विषयक, सामाजिक, समस्यांनाही विनोबांच्या शिक्षण विचारात उत्तर सापडते. त्यातच त्यांचा द्रष्टेपणा, व्यापक दृष्टी जाणवते आणि त्यांच्यासमोर आपण मनापासून नतमस्तक होतो. विनोबांचे विचार आपल्याला अंतर्मुख करतात व विधायक कृती करण्यास प्रवृत्त करतात, प्रेरणा देतात.

महात्मा गांधीजींनी १९३६ साली सेवाग्राम येथील एका अधिवेशनात आपले शिक्षण विषयक विचार नई तालीम शिक्षण तत्वज्ञान सर्वप्रथम मांडले. त्यावेळेस गांधीजी म्हणाले होते की, नई तालीम शिक्षण विचार ही मी माझ्या देशाला दिलेली शेवटची देणगी आहे असे माना. यानंतर देशातील राजकीय घडामोडी प्रचंड वेगाने सुरू झाल्या व यामध्ये गांधीजी पूर्ण व्यस्त झाले. त्यामुळे नई तालीम शिक्षण विचारांची सूत्रबद्ध व सविस्तर मांडणी करण्याचे व त्याला व्यवहाराची जोड देण्याचे काम पुढे विनोबांनी केले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर विनोबांचे म्हणणे होते की 'नवे राज्य आल्यावर जसा नवा झेंडा आला, तसेच नवे शिक्षणही आले पाहिजे'. यासाठी देशातील सर्व शिक्षण संस्था काही दिवस बंद ठेवाव्यात, देशातील सर्व शिक्षण तज्ज्ञांनी एकत्र यावे, चिंतन, विचार विनिमय करावा व सर्वांनी मिळून देशाचे नवे शैक्षणिक धोरण बनवावे, नवीन शिक्षण व्यवस्था

उभी करावी. विनोबांच्या मते हीच खरी ‘नयी तालीम’ होती. याच्याही पुढे जाऊन विनोबांनी म्हटले होते की, नयी तालीम ही एक सतत विकसित होणारी, स्थानिक गरजांनुसार बदलत जाणारी, नव्याने आकार घेणारी, शिक्षण व्यवस्था आहे. ती स्थानिक परिस्थितीनुसार नवे रूप, नवे आकार घेऊन व्यक्त व्हायला हवी. नवीन नवीन ज्ञानाची कवाडे उघडत जाऊन, नवे ज्ञान – माहिती – कौशल्यांना सामावून घेणारी ‘तालीम’ असावी. नयी तालीमचा असा व्यापक अर्थ विनोबांना अभिप्रेत होता. असे शिक्षण स्थापित करण्यासाठी त्यांनी छोटे छोटे मुद्देही उदाहरणासह स्पष्ट केले आहेत. तेच मुद्दे आजच्या शैक्षणिक परिस्थितीशी जोडून पहात, त्याचा कालोचित अर्थ समजून घेणे गरजेचे आहे.

## माझी कविता...

# जिल्हा परिषद शाळा

**(चाल -अंजनीच्या सुता तुला)**

माझी शाळा आहे छान
आहे गुणवत्तेची खाण
जिल्हा परिषद शाळा आमुची
आहे गावाचा अभिमान।। धृ।।
शाळा उघडताच भरतो
छोट्या पाखरांचा मेळा
खेळ, गाणी, गोष्टी आणि
ज्ञानाचा सोहळा
इंग्रजी-मराठी भाषा
शिकवू गणित विज्ञान।। १।।
जिल्हा परिषद शाळा आमुची......।।
ज्ञानरचनावाद
नवे उपक्रम होतात
विविध स्पर्धा आणि
खेळ इथे रंगतात
बाल आनंद मेळावा
अन् वार्षिक स्नेहसंमेलन।। २।।
जिल्हा परिषद शाळा आमुची......।।
नाही कोणी येथे
गरीब -श्रीमंत
योजनांचे सर्व लाभ
समान मिळतात
मोफत पाठ्यपुस्तक
गणवेश अन् स्नेहभोजन।। ३।।
जिल्हा परिषद शाळा आमुची......।।
मुलांचे कौतुक करण्या
माता -पालक येतात
शिक्षक -पालक सभेतुन
आढावा घेतात
सर्व पालक विचारांचा
येथे होतो सन्मान।। ४।।
जिल्हा परिषद शाळा आमुची......।।
घडलेत डॉक्टर, इंजीनियर
वकील अन् शिक्षक
इथेच घडतील नवीन
शास्त्रज्ञ अन् सैनिक।। ५।।
म्हणुनच माझी शाळा आहे
सत्यम् शिवम् सुंदरम्





**श्रीमती सुनिता भागवत पाटील**
जि.प.केंद्रशाळा वावडे
ता.अमळनेर जि.जळगांव
9403457602



प्रा.डॉ.नंदा हरम
विज्ञान प्रसारक,पुणे
९३७२९१०३०६

# ।। प्लॅटिपस ।।

**सदरा विषयी : समान वैशिष्ट्यांच्या आधारे सजीवांचे वर्गीकरण केले जाते. पण काही सजीव असे असतात. की त्यांचे सम जातीपेक्षा एखादे वैशिष्ट्ये वेगळे असते किंवा दुसऱ्या जाती/प्रजाती/वर्गाची वैशिष्ट्ये त्यांच्यात आढळून येतात अशी विचित्र संगम असलेली वैशिष्ट्ये त्या सजीवांना वेगळेपण प्राप्त करून देतात. ते अधोरेखित करणारे हे सदर आम्ही, आहोतच वेगळे !**

महेश : आई,२००० साली सिडनी येथे ऑलिंपिक झालं ना, त्या ऑलिंपिकच्या शुभंकर चिन्हान (आकृती क्र.१) तीन प्राण्यांचा समावेश आहे.

आई : बरोबर, मला आठवते त्याप्रमाणे ऑली, सीड आणि मिली.


महेश: एवढं कसं ग लक्षात रहांत तुझ्या? ग्रेट.....! ऑली एखादा पक्षी दिसतोय, पण तो सीड आणि मिली....त्यांच्याविषयी सागंशील का?





आई : सीड म्हणजे सिडनीत आढळणारा. प्लॅटिपस आणि मिली आहे इकिडना.

महेश: प्लॅटिपस नेमका तो आहे कोणत्या वर्गाचा प्राणी आहे?





आई : खरं म्हणजे तो आहे सस्तन प्राणी. पण तो अंडी घालतो आणि चालण्याची ढब आहे सरपटणाऱ्या प्राण्यांसारखी. तर चोच बदकासारखी. आणि पायांची रचना आणि पिलांना दूध पाजतो, सस्तन प्राण्याप्रमाणे.

महेश: अगदी विचित्र संगम आहे, नाही? त्याचं थोडं वर्णन करना.

आई : सांगते. प्लॅटिपस मुख्यत्वे गोड्या पाण्यात रहातात. पण बीळ तयार करण्याकरिता नदीकिनारी येतात.

महेश: म्हणजे आई... पोहोण्यायोग्यच त्यांच शरीर असेल ना?

आई : शंभर टक्के खरा आहे तुझा तर्क! पाण्यात पोहोण्यासाठी योग्य असा त्यांचा शरीराचा आकार असतो. शेपटी रूंद व चपटी असते. (आकृती क्र.२ पहा.) शरीरावर घनदाट. तपकिरी रंगाची लव असते.

महेश: एक शंका आहे. आई. पाण्यात असल्यामुळे त्याचा त्रास नाही. का होणार?

आई : तुझी शंका रास्त आहे. पण निसर्गाने ती सोय करून ठेवली आहे. लवेच्या खाली असलेल्या हवेच्या थरामुळे प्लॅटिपसच शरीर ऊबदार रहातं. ही लव जलाभेद्य असते.

महेश: तू आधी म्हणतेस त्याचप्रमाणे, त्यांच्या पायाची रचना बदका-सारखी असते ना?

आई : चांगल लक्ष आहे तुझं! त्याच्या पायाची बोटं एकमेकांना पडद्याने जोडलेली असतात. फरक एवढाच की, पुढील पायांतील बोटांमधील पडदा बोटांपेक्षा मोठा असतो. तर मागील पायांमधील छोटा असतो.

महेश: आई.... त्यांचे पाय सरपटणाऱ्या प्राण्यासारखे शरीराच्या बाजुला आहेत ना? चित्रात स्पष्ट दिसतंय.

आई : चांगल निरीक्षण करतोस, बाळ! जमिनीवर चालताना पुढील पंजामधील पडदा मागे दुमडला जातो.

त्यामुळे त्याचे संरक्षण होते.

महेश: आणि पोहताना.... ?

आई : पोहताना शरीर पुढे ढकलण्याकरिता तो पुढील पायांचा वापर करतो. शेपटी व मागील पायांच्या सहाय्याने दिशा बदलतो.

महेश: म्हणजे वल्हयासारखा...बरं चोचीबद्दल सांग ना.

आई: त्याला चोच म्हणत नाही, तर तुंड. त्याच्या तोंडाच्या ठिकाणी रबरी नळीसारखं आणि बदकाच्या चोचीच्या आकराचं चपटं, संवदेनशील तुंड असतं.


महेश: आई, तू संवदेनशील का म्हणतेस ?

आई : फार छान प्रश्न विचारलास बघ! प्लॅटिपसच्या वरच्या आणि खालच्या तुंडच्या बाहेरच्या आणि आतील पृष्ठभागावर मिळूण एकूण ४०,००० विघुतग्रहण केंद्रें असतात.त्या व्यतिरिक्त ६०,००० यांत्रिकग्रहण केंद्रे असतात. ही रांगेत रचलेली असतात.(आकृती क्र.३ पहा)

महेश: या केंद्रांचा काय उपयोग ?

आई : भक्ष्य पकडण्यासाठी

आई : भक्ष्याच्या हालचालीने पाण्याच्या प्रवाहात झालेला बदल यांत्रिक ग्रहण केंद्राला जाणवतो. तर विद्यतग्रहण केद्रांना भक्ष्याकडून आलेली विद्युतप्रेरणा जाणवते. या दोन्ही केंद्राकडून आलेल्या संवेदनांकरून एक प्रकारचा नकाशा तयार होतो, ज्यामुळे भक्ष्याचे स्थान नेमके कळते.


तुंडावरील विद्युतग्रहणकेंद्रे

२० मायक्रोव्होल्ट १.सेमी इतके कमी विद्युत क्षेत्रही प्लॅटिपसला जाणवते.

महेश : नेमकं काय आणि कस पेडतं ? ते सांग ना.

आई : सांगते. ऐक भक्ष्याच्या शोधात प्लॅटीपस पाण्यात बुडी मारतो. तेंव्हा तो त्याचे डोळे, कान आणि नाक बंद करतो. पाण्याच्या तळाशी जेंव्हा तो तुंडाच्या सहाय्याने गाळ उकरतो, तेंव्हा भक्ष्याच्या स्नायुंच्या आकुंचनाने निर्माण झालेला विद्युत प्रवाह त्याला विद्युत ग्रहण केंद्रामुळे जाणवतो.

महेश: ते कसं ?

महेश: भक्ष्यांची हालचाल त्याच्या यांत्रिक ग्रहण केंद्रांना जाणवत असेल ?

आई: अगदी बरोबर! त्यामुळे सजीव व निर्जीव वस्तुंमधील फरक प्लॅटिपसला कळतो. दोन्ही केंद्रांना मिळालेल्या संवेदनातील वेळेच्या फरकामुळे अंतराची जाणीव होते.

महेश: व्वा,मस्त!

आई : हे पकडलेलं भक्ष्य तो गालातील कोष्टात ठेवून तो पृष्ठभागावर येतो. त्याला त्याच्या वजनाच्या २०% अन्न ग्रहण कराव लागंत. त्याकरिता त्याला सरासरी १२ तास भक्ष्य पकडण्यासाठी घालवावे लागतात.

महेश: आई..... त्याच्या शरीराचं तापमान आपल्या सारखंच म्हणजे ३७° सेंटिग्रेड असतं का ?

आई : नाही ३२° सेंटिग्रेड असतं. विशेष गोष्ट अशी की ५°. सेंटि इतका कमी तापमान असलेल्या पाण्यात अनेक तास राहूनही त्याच्या शरीराचं तापमान तेवढेच म्हणजे ३२° सेंटिग्रेड असते.

महेश: ग्रहण केंद्राच्या नादात बाकीची माहिती राहिली...

आई : राहील कशी? तुंडाच्या खालच्या बाजूला तोंड असतं, वरच्या पृष्ठभागावर दोन नाकपुड्या असतात. तुंडाच्या मागे तर दोन बारीक डोळे व कानाची पाळी नसलेली कानाची फक्त भोकं असतात. प्लॅटिपसच्या डोळ्यांच्या पडद्यामध्ये 'डबल कोन' पेशी असतात ज्या पक्षी व सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये आढळतात.

महेश: आणखी काही वैशिष्ट्य ?

आई: प्लॅटिपसमध्ये मागच्या पायाच्या


घोट्याजवळ आतल्या भागाकडे अणकुचीदार नखी असते मात्र फक्त नरच या नखीद्वारे विष उत्सर्जित करतो. प्रजोत्पादनाच्या काळात या विषाचं प्रमाण जास्त असतं.

महेश: संरक्षणाकरिता असेल बहुतेक?

आई : संरक्षण होत असलं, तरी तो मूळ हेतू नसावा. फक्त नरांमध्ये विष आढळत. याचा अर्थ स्वत:च वर्चस्व सिध्द करण्याकरिता नर याचा उपयोग करत असावा.

महेश: ही विषग्रंथी शरीरात कुठे असते?

आई: ही ग्रंथी मांडीच्या वरच्या भागात असते. किडनीच्या आकोराच्या विषंग्रथीमध्ये (आकृती क्र४.पहा) तयार झालेलं विष पातळ आवरण असलेल्या विषनलिकेतून नखीमध्ये येंत. नखीचं वैशिष्टय म्हणजे पायाशी काटकोनात ती फिरू शकते.




महेश: आई... तू सुरूवातीला म्हणालीस ना, प्लॅटिपस सस्तन प्राणी असूनही पिल्लांना जन्म न देता अंडी घालतो.

आई : हो म्हणूनच त्याचा 'मोनोट्रीम' या गटात समावेश होतो.

महेश : वेगळाच शब्द आहे ना?

आई : हो, हा ग्रीक शब्द आहे.'मोनोस' म्हणजे एक (सिंगल) आणि ट्रीमा म्हणजे छिद्र (होल). या प्राण्यामध्ये एकच छिद्र असतं. प्रजनन, उत्सर्जन आणि पचन संस्था या तिन्ही संस्था या छिद्रातच उघडतात.

महेश: बाप रे!

आई : मादीमध्ये दोन अंडाशय असतात, परंतू फक्त डावीकडचं कार्य-क्षम असतं. नराचे वृषण बाहेरील अंडकोषात नसून शरीरात असतं. वीणीनंतर मादी २० मीटर लांबीचं बीळ तयार करते.

महेश: वीणीचा हंगाम कधी असतो?

आई : जून ते ऑक्टोबंर. बीळाची जमीन मऊ करण्याकरिता मादी पालापाचोळा वापरते. तसेच बीळाच्या शेवटी काड्यांनी पाचोळ्या ने बिछाना तयार करते. बिळामध्ये ठिकठिकाणी अडथळे निर्माण करते. सांग बर, कशाकरिता? पकडण्यासाठी

महेश : भक्षकांपासून रक्षण व्हावं म्हणून...हो ना?

आई : हो...अन् त्याचबरोबर बीळात पाणी शिरू नये म्हणून.

महेश: आई, ती एकावेळी किती अंडी घालते?

आई : एक ते तीन मुख्यत्वे दोनच ही अंडी लहान, साधारण ११ मिमी. व्यासाची, चामडच्यासारखी चिवट (सरपटणाऱ्या प्राण्याच्या अंडच्यासारखी) आणि पक्ष्यांच्या अंड्यापेक्षा थोडी गोलाकार असतात.

महेश: या सर्वाचा कालावधी काय?

आई : अंडी गर्भाशयात २८ दिवस असतात तर बाहेर उबवण्याचा काळ १० दिवसांचा असतो. अंड घातल्यानंतर मादी त्या भोवती वेटाळे करून बसते. उबवण्याच्या काळाच्या तीन अवस्था असतात.

महेश: त्या कोणत्या?

आई : पहिल्या अवस्थेत गर्भाला कोणताही अवयव नसतो. अंड्यातील बलक तो शोषून घेतो. दुसऱ्या अवस्थेत पाय फुटतात तर तिसऱ्या अवस्थेत दात येतात.

महेश : ही पिल्लं कशी असतात?

आई : ही अंड्यातून बाहेर आलेली पिलू केशहीन, आंधळी आणि असुरक्षित असतात. आईच्या दुधावरच ती वाढतात. मादीमध्ये दुग्धग्रंथी असल्या तरी स्तनाग्रे नसतात. त्यामुळे त्वचेच्या छिद्रांतून दूध झिरपते: ते पिल्लु

चाटून घेतात. म्हणूनच दूधात जीवाणूंचा नाश करणारी प्रथिने भरपूर प्रमाणात असतात.

महेश: ही पिल्लु किती महिने आईजवळ असतात?

आई : ही पिल्लु तीन ते चार महिने आईजवळ असतात? चार महिन्यानंतर ती बीळातून बाहेर पडतात.

महेश: त्यांना दात असतात का गं?




आई : पिल्लांना सुरूवातीला दात असतात. पण प्रौढ झाल्यावर दात जाऊन त्याच्या जागी कडक आणि खडबडीत प्लेट- सारखा भाग तयार होतो, ज्याचा उपयोग अन्नाचे चर्वण करण्याकरिता होतो. इतर सस्तन प्राण्यांच्या तुलनेत प्लॅटिपस च्या जबड्याची रचना तसेच जबडा उघडणारा स्नायू वेगळा असतो. त्याच्या खांद्याच्या कंकणाकृती भागात एक जास्तीचं हाड असतं

महेश : आई, मस्त माहिती सांगितलीस नू प्लॅटिपसबद्दल. मला आवडला हा प्राणी.....

आई : खरोखरच, एक अद्रितीय प्राणी आहे. म्हणूनच की काय, ऑस्ट्रेलियाने त्यांच्या पोस्टाच्या तिकीटवर व नाण्यावर प्लॅटिपसचं चित्र छापून त्याला गौरविलं आहे.

**साभार: आकृत्या/चित्रे माहिती जालाच्या सौजन्याने.**

## माझी कविता...

### चिऊताई



चिऊ चिऊ चिऊताई
का गं असं करतेस
मला पाहून तू अशी
का भुर्कन उडतेस

मधुर मला वाटते
गाणं तुझं चिऊ चिऊ
गेलीस तू भुर्कन
आता एकटी कशी गाऊ

ये ना गं तू इकडे
माफी तुझी मागते
चल तुला खायला
दारी मी दाणे टाकते

येऊ कशी मी खेळायला
तुमची शहरं किती वाढली
माझ्यासाठी तुम्ही आता
झाडं शिल्लक कुठं ठेवली



**रामकृष्ण पांडुरंग पाटील**
मु.पो.विखरण ता.जि.नंदुरबार
९४०८८८५७७५

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे **Reg No.**



**युवराज माने**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी
ता. सेलू जि. परभणी ७५१७४७८५७०

# ।। आयुष्याचं गूरूकूल ।।

शिक्षकाची उदासीनता मला व्याकूळ करते.एक उदास शिक्षक आपले औदासीन्य समोरच्या पिढीत संक्रमित करतो. शिक्षकासारखे महत्त्वाचे , मन घडवणारे पद ज्या गाफीलपणे निवडण्याची पद्धत आपल्या राष्ट्रात रूढ आहे ,तेवढ्या एका गोष्टीवरून देशाचं भवितव्य दोलायमान वाटतं . कालचा सामान्य विद्यार्थी चटकन एखादी परीक्षा दिली की, शिक्षक म्हणून उभा राहू शकतो , हीच किती अधर्माची गोष्ट आहे .खरं तर रियाजाशिवाय, वर्षानुवर्षाच्या तपश्चर्याशिवाय जसा एखादा गायक बुलंद होत नाही ,त्याचप्रमाणे शिक्षक हे तपश्चर्येचं दुसरं नाव हवं........हे 'प्रवीण दवणे' यांचे विचार ज्यादिवशी वाचले त्या दिवसापासून स्वतःच्या आतमध्ये डोकावण्याची व सतत आपल्या कृतीचा आढावा घेण्याचा माझा कार्यक्रम सुरू झाला. दवडीपार आणि पलखेडा या दोन्ही ठिकाणच्या शाळामध्ये काम करताना याच भूमिकेतून काम केलं .ती भूमिका किती महत्त्वाची होती हेही लक्षात आलं.

शिक्षकांचं नेमकं कार्य काय? शब्दांचे अर्थ सांगणं? प्रश्नांची नेमकी उत्तर देऊन त्याला यशस्वी करणं ? की कायमची एक जीवनदृष्टी देणे? या प्रश्नांची शिक्षक म्हणून जे जे काम करत आहेत त्या सर्वांनी नेमकी उत्तरे शोधली पाहिजेत .आपली भूमिका निवडली पाहिजे .प्राथमिक शिक्षणात काम करत असताना आपल्याला योगायोगानं मिळालेला हा शिक्षकपणाचा व्यवसाय किती महत्त्वपूर्ण आहे हे समजून कर्म करणं महत्त्वाचा आहे. ज्यायोगे मुलांचं कुतूहल जाग होईल , त्यांना मनापासून एखादी गोष्ट करण्याची इच्छा होईल .एवढे कौशल्य गुरुजीत तर नक्कीच असायला हवं! शिक्षकी पेशात प्रवेश केलेल्या प्रत्येकाने आपली भूमिका तपासून घ्यायला हवी,कारण आपण 'अनेकांच्या आयुष्याचं गुरुकुल' बनणार असतो. असं मनात सतत चाललेले चिंतन आपली स्वतःची भूमिका तपासण्याचे काम सेवेच्या पहिल्या तपापासून सुरु आहे. शिक्षकाच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक मुलाचा तो आयुष्यभर गुरुकुल बनत असतो. म्हणून आपल्याला 'मुलं' कळली पाहिजेत. मुलांबरोबर रहावं कसं अन, त्यांच्याबरोबर काम करावं कसं हे ज्या शिक्षकाला कळलं त्यांन मुलांना जिंकलं .आणि या जिंकलेल्या प्रत्येक मुलाच्या आयुष्यातलं आपण एक उत्तम गुरुकुल बनलो हे त्या शिक्षकांन समजावं! दररोज शाळेत प्रवेश केल्याबरोबर चिमुकली आपल्या गुरुजींकडे धावत येतात आणि चेहऱ्यावरील जगातील सर्वात सुंदर चित्र दर्शवतात ,तेव्हा शिक्षकाच्या डोक्यावरील सर्व ताणतणाव निघून जातात ही प्रचिती शाळेत जाणाऱ्या ,प्रत्येक गुरुजीला येत असते.ज्युलिया वेबर गार्डन तिच्या 'टीचर' या आत्मचरित्रात म्हणते.,''टीचर ,टीचर अशी शीळ घालणाऱ्या पक्षांनी सुरेख सकाळी माझं गोड स्वागत केलं की,मन नेहमी प्रसन्न होतं.'' एक माणूस म्हणून जन्मलो पण आजन्म विद्यार्थी म्हणून शाळेत जाण्याचे भाग्य फक्त शिक्षकालाच लाभतं हे शिक्षकानं विसरता कामा नये.

'' कुतूहलाच्या पाऊलवाटेवर उत्तरं हाती येऊ लागतात.चिमुकल्या उपक्रमांच्या तरलतेतून केवढं विश्व साकारता येतं.

याचा प्रत्यय सेवेच्या पहिल्या तपातील पावलापावलावर येत होता .शाळेच्या प्रत्येक उपक्रमात सहभाग दर्शवणारी आणि तितक्याच तन्मयतेची भूमिका घेऊन प्रत्येक स्पर्धेत बक्षीस पटकावणारी करुणा टेंभुर्णीकर, सकाळी-सकाळी गावभर फिरून मासे विकणारी शिल्पा किंवा डोक्यावर लाकडी मोळी विकून शाळेत येणारी वर्षा या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयीच्या गोडीचं सतत कुतूहल वाटत आलं आणि हीच लेकरं भविष्यात प्रेरणादायी ठरत गेली .या लेकरांच्या बाबतीत फक्त त्यांना त्यांच्यातला राजहंस शोधून देण्याचं काम करता आलं आणि त्या लेकरांनी तो राजहंस जपण्याचं काम केलं. गावभर फिरून उनाडक्या करणारा जितेंद्र शाळेत सर्वांच्या नजरेत खोडकर ठरलेला परंतु मायेच्या प्रेमाने जवळ घेऊन त्याच्या आतमध्ये लपलेलं वेगवेगळ्या कृतीच मोहोळ त्याला दर्शन देऊन शाळेच्या राजवाटेवर मार्गस्थ केलं .शिक्षक म्हणून पार

पडलेली महत्त्वाची भूमिका आजही मनाला आनंद देऊन जाते. ''एका विद्यार्थ्याची वेदना ही अनेकदा त्या पिढीची वेदना असते.'' हे ओळखण्याची सृजनशीलता ज्या शिक्षकांमध्ये असते तो तर त्यांची वेदना जाणून यावर उपाय योजनेसाठी सतत धडपडत असतो. रितेश आणि राहुल दोन्ही हरहुन्नरी विद्यार्थी सतत आईची तब्येत खराब असल्यामुळे चिंताग्रस्त नजरेने बसलेली असायची. याही लेकरांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी जी थोडीफार मदत करता आली तीसुद्धा मनाच्या कुपीत सदैव ताजी आहे. ''संवेदनेने पदाचा विस्तार होतो करुणेने कार्याला खोली येते.''

माझ्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अशा सुख-दुःखात मला सहभागी होता आलं आणि त्यांनीही मला तितक्याच आपुलकीने सहज सामावून घेतलं हे खरं माझं शिक्षकपणाचं देणं होय.

ज्यांना प्रत्यक्ष भेट न हा आयुष्याचा सोहळा झाला असता अशा अनेक व्यक्तिमत्वांची भेट सेवेच्या पहिल्या तापामध्ये डॉ. संध्या पवार स्वतःची शाळा सांभाळून व्यसनमुक्तीसाठी अनेक शाळांमध्ये जाऊन पायात भिंगरी बांधल्यासारखी सतत भटकणारी ही भगिनी ! अनाथ मुलींना स्वतःच्या घरी सांभाळून त्यांचे शिक्षण पूर्ण करून त्यांचा संसार उभा करून देण्यापर्यंत जिम्मेदारी घेणारी ही ताई भेटली .आणि कार्याला नवा आयाम मिळाला. प्रत्यक्ष माझ्या शाळेत येऊन डॉक्टर संध्या ताईंनी जो अनमोल संदेश दिला तो संदेश मुलं कधीच विसरू शकणार नाहीत .भाषा विद्यार्थ्यांच्या मनात तरल संवेदना निर्माण करण्याचे काम करते स्वतःच्या मायबोलीत बोलणारा कुणी भेटला की विद्यार्थ्यांना आपलासा वाटतो .असंच व्यक्तिमत्व सुप्रसिद्ध कवयित्री उषाकिरण आत्राम व माणिक गेडाम या दोन व्यक्तिमत्वांचा जवळून स्पर्श झाला .माझ्या शिक्षकपणाला एक नवीन आयाम प्राप्त झाला . दवडीपार या गावांमध्ये तीन वृद्ध म्हाताऱ्या माझ्या जवळच्या मैत्रिणी झाल्या होत्या. दर शनिवारी तिघींसोबत मस्त गोष्टींचा कार्यक्रम रंगायचा .या तिघीही जणींचे मूलबाळ कामानिमित्त बाहेर असायचे आणि त्या एकत्र राहायच्या त्यांच्यासोबतच्या अनेक चर्च मधून नवनवीन गोष्टी मला शिकायला मिळाल्या. असे वेगवेगळे गुरुकुल पावलापावलावर लाभत गेले. आदर्श शिक्षक व उत्कृष्ट कार्यकर्ता केंद्रप्रमुख म्हणून नावाजलेलं व्यक्तिमत्व रघुपती आगडे यांनी अगदी स्वतःच्या मुलाप्रमाणे अनेक प्रसंगी नवनवीन गोष्टींची रुजवात माझ्या मनात केली आणि माझ्यातल्या शिक्षकपणाला नवीन आयाम तयार करून दिले .काही व्यक्तिमत्त्वाचा माझ्या शिक्षकपनात खूप मोठा वाटा आहे याठिकाणी अधोरेखित करायला मला आवडेल. ''प्रयत्नपूर्वक जे पदरात पडलं आहे त्याचा उत्सव करायला शिकायला हवं.''

अशी शिकवण देणारे माझी पलखेडावाशी बंधू-भगिनी जंगलाच्या पायथ्याशी असलेले खेडेगाव आधुनिक सेवा साधनांची उपलब्ध नसतानाही आनंददायी जीवन कसं जगावं हे त्यांच्याकडून शिकलो. अतिशय उत्सवप्रेमी असणारी ही माणसं आणि पैसा दाग-दागिने, धनदौलतची कसलीही अभिलाषा राहिली नाही. माझ्या आयुष्यातील ५८ व्या वर्षापर्यंत अनेक विद्यार्थ्यांचे गुरुकुल म्हणून माझ्याकडे पाहिले जाणार हे कळल्यावर झपाटून कामाला लागलो. नुसतं वर्गातलं बुळबुळ शिकवणं म्हणजे अध्यापन नाही .हे अनेक वेळा मला लक्षात आलं मूल जेव्हा शाळेबाहेरच्या जगात डोकावून पाहण्यासाठी बाहेर पडतात तेव्हा ती चैतन्यात नुसती फुललेली असतात. आपल्या भोवतालचे जग कसं चालतं ते जाणून घेण्याची प्रचंड उत्सुकता असते. ही उत्सुकता जाणून कृती केली पाहिजे. स्वतःहून आपल्या जगण्यातलं जाणतेपण विद्यार्थ्यांच्या समोर सादर करता आलं पाहिजे.एका ठिकाणी प्रवीण दवणे म्हणतात,शिक्षक हा पेशाच असा आहे की जसं आश्रमात गेल्यावर उदात्त विचार येतात .शिवल्यात शिरल्यावर बेल्पत्राच्या गंधानं मनात 'सत्यम शिवम, सुंदरमच्याच लहरी उघडाव्यात. शिक्षकी पेशात शिरल्यावर आपोआपच जबाबदारीची सत्वयुक्त वागण्याची प्रेरणा होते.इच्छा असो नसो गंगेच्या दर्शनानं मन विशाल होतेच तिच्या भेटीने मनात मुरली वाजतेच तसा आपण शिक्षक झालो या जाणिवेतच एक झेप आहे ,विकास आहे,प्रकाश आहे.

मी शिक्षक म्हणून शाळेत जेव्हा नियुक्त झालो आणि मनात आलं काय गंमत आहे .आता मी रोज शाळेत जाणार ,कामावर किंवा ऑफिसमध्ये जाणार नाहीतर मी शाळेत जाणार ! वयाच्या ५८ व्या वर्षापर्यंत मी शाळेत जाणार !

तोपर्यंत मी शाळकरी मुलगाच असणार ! शेवटापर्यंत बालपण जगत राहणं किती हा भाग योग म्हणावा लागेल! ही ज्या दिवशी समजलं त्या दिवसापासून मला शिक्षकी पेशाविषयी कमालीचा आदर निर्माण झाला.व आणखी कसा सन्मान वाढेल यासाठी प्रयत्न करू लागलो.एक ऊर्जा निर्माण झाली आणि आजही तीच उर्जा माझ्या विद्यार्थ्यात सहजपणे प्रवाहीत करण्याचं भाग्य मिळालं .सेवेच्या अनेक कालावधीमध्ये पुष्कळदा सहकारी शिक्षक तुलना करीत अध्यापनाचे श्रम करत अशी तुलना ही फार मोठी अडचण ठरली .आपल्या श्रमाचा प्रयोगाचा आनंद हा आपला आनंद आहे. वापरली जाणारी भांडी चकचकीत असतात. माळ्यावर आराम करणारी भांडी कळकतात. स्वतःहून नव्या परिश्रमात उपक्रमात घ्यायला हवं .ते आराम करतात मग मी कशाला करू? यात त्यांचं नुकसान होत नाही आपलं होतं .प्रत्येकाची एक जीवनशैली असते .काहीजण कामचुकारपणा करायला जन्माला आलेली असतात अशा प्रवृत्तीशी संगनमत करायचं व काम करत राहायचं . नवा उपक्रम हा आपल्या धडपडीचा आरसा असतो .असं नवं तत्वज्ञान पुढे कार्य करताना मिळत गेलं.शिक्षकांच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचं ते गुरुकुल असतात. हे जाणून माझ्यासारख्या असंख्य गुरुजनांनी आपल्यासमोरील प्राथमिक शिक्षणातील दिवसभर समोर असलेल्या लेकरांची जीवनज्योत उजळली तर त्यांच्या आयुष्यातले ते महत्त्वपूर्ण गुरुकुल असणार आहेत यात शंका नाही .खऱ्या शिक्षकांचं स्मारक कुठं समूर्त असतं ? शेकडो मुला-मुलींच्या मनात सच्चा गुरूंच्या आठवणींची निरांजन अक्षय उजळलेले असते.त्या प्रकाशात तर काळोखातल्या पाऊलवाटा संवाद साधत असतात... संवाद साधत असतात.

## नवीन उपक्रम...

# मराठी भाषा पंधरवडा निमित्ताने जी. टी. पाटील महाविद्यालयात चालता बोलता कार्यक्रम

महाराष्ट्र शासन व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान मराठी भाषा पंधरवडा जी .टी .पाटील महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने सह्याद्री वाहिनीवरील चालता बोलता या मालिका सदृश्य कार्यक्रमावर आधारित मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी करावयाचे प्रयत्न ,मराठी साहित्य, त्यातील गाजलेल्या कलाकृती, साहित्य संमेलने ,विविध पुरस्कार यासंदर्भात प्रश्नावली तयार करून महाविद्यालयाच्या मैदानावर उपस्थित विद्यार्थी ,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामान्यज्ञानावर आधारित प्रश्न विचारण्यात आले. सलग तीन प्रश्नांची उत्तरे देणाऱ्यास बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाने चांगलाच रंग भरला होता. या स्पर्धेत प्रा. दिनेश देवरे, प्रा. विलास पाटील, प्रा. डॉ.वायसे ,प्रा. माधव वाघमारे, प्रा.मतीन शेख,प्रा.संदीप बडगुजर यांच्यासह कमलेश महाले ,काशिनाथ पिसाळ यांनी बक्षिसे प्राप्त केली .विजेत्यांना चांगल्या दर्जाचे पॅन भेट देण्यात आलेत .यावेळी संस्थेचे समन्वयक डॉ. एम .एस .रघुवंशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.श्रीवास्तव, उपप्राचार्य डॉ. आर .आर.कासार, उपप्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य ए.के. शेवाळे ,मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.प्रकाश भामरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठी विभागाच्या प्रा. डॉ. विजया पाटील , डॉ. अमोल भुयार,प्रा .माधव वाघमारे डॉ. विजय चौधरी ,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने आर बी पाटील ,ग्रंथालय विभागाच्यावतीने डॉ. विनोद रघुवंशी यांच्यासह सगळ्यांनी सहकार्य केले .चालता बोलता मालिकेच्या धर्तीवर आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक मराठी विभागाचे प्रा. डॉ. माधव कदम यांनी केले. प्रा. जितेंद्र पाटील यांनी आभार मानले .याच वेळी युवारंग युवक महोत्सवाच्या निमित्ताने सहभागी झालेल्या कलावंतांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम ही सर्वांसमोर सादर करण्यात आला.संगीत शिक्षक हेमंत पाटील,प्रा.शुभांगी देवकर यांनी या कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.या कार्यक्रमालाही विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.



**मेघश्री दळवी**
मुंबई

# ४९५

कोणतीही एक तीन अंकी संख्या घ्या. त्यात निदान दोन अंक वेगवेगळे हवेत. म्हणजे १११ किंवा ४४४ अशा संख्या नकोत. पण २२३, ७११ अशा संख्या चालतील.

आपण घेऊया ३१४. आता त्यातले अंक चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडून दोन संख्या मिळवा. आपल्याला मिळतील १३४ आणि ४३१. आता त्यातल्या मोठया संख्येतून लहान संख्या वजा करा. उत्तर येईल २९७.

या संख्येतले अंक पुन्हा चढत्या-उतरत्या क्रमाने मांडून दोन संख्या मिळवा. ९७२ आणि २७९ या त्या संख्या. यांचीही वजाबाकी करून बघा. असं करत राहिलात तर शेवटी मिळेल ४९५. आणि मग ४९५ वर कितीही वेळा हा प्रयोग केलात तरी मिळत राहील फक्त ४९५ च!

आता हाच प्रयोग आणखी काही तीन अंकी संख्यांवर करून बघा. पण लक्षात असू द्या - त्यात निदान दोन अंक वेगवेगळे हवेत. चढत्या-उतरत्या क्रमाने तीन अंक मांडून दोन संख्या मिळाल्या की त्यांच्यातला फरक किती आहे ते पहा. पुन्हा हीच क्रिया करा. शेवटी किती आलं उत्तर?४९५ ना...!

हीच आहे ४९५या संख्येची गंमत. आणि ती शोधून काढली आपले प्रसिद्ध भारतीय गणितानंद दत्तात्रय रामचंद्र कापरेकर यांनी. ४९५ ही संख्या यासाठी तीन अंकी कापरेकर स्थिरांक (कापरेकर कॉन्स्टंट) म्हणून ओळखली जाते. कापरेकर यांनी असा चार अंकी स्थिरांकही शोधला आहे - ६१७४. मात्र त्यापुढे चारहून जास्त अंकी संख्यासाठी असे स्थिरांक मिळू शकत नाही.


| | चढता क्रम | उतरता क्रम |
|---|---|---|
| ३१४ = | १३४ | ४३१ |
| | ४३१ - १३४ = २९७ | |

| | चढता क्रम | उतरता क्रम |
|---|---|---|
| २९७ = | २७९ | ९७२ |
| | ९७२ - २७९ = ६९३ | |

| | चढता क्रम | उतरता क्रम |
|---|---|---|
| ६९३ = | ३६९ | ९६३ |
| | ९६३ - ३६९ = ५९४ | |

| | चढता क्रम | उतरता क्रम |
|---|---|---|
| ५९४ = | ४५९ | ९५४ |
| | ९५४- ४५९ = ४९५ | |

| | चढता क्रम | उतरता क्रम |
|---|---|---|
| ४९५ = | ४५९ | ९५४ |
| | ९५४ - ४५९ = ४९५ | |



**दत्तात्रय रामचंद्र कापरेकर**
जन्मः १७ जाने १९०५ (डहाणू)
मृत्यू - १९८६ (देवळाली नाशिक)
जागतिक किर्तीचे गणितज्ञ. रूग्लबर परांजपे पारितोषीक प्राप्त माध्यमिक शिक्षक म्हणून कार्य.



**सी.डी.पाटील**
आर.सी.पटेल,शाळा शिरपूर जि.धुळे
९८८१०३३३४८

# झाँकीतून खेलायन

आजकाल खेळांकडे दुर्लक्ष होतंय. ही ओरड नेहमीच चिंतेत भर घालणारी ठरते. मुलांना खेळाची ओढच राहिलेली नाही. तर एवढेच नाही तर मुले मैदानात कमी वेळ दिसू लागली आहेत. भ्रमणध्वनी अर्थात मोबाईल वापराचा दुष्परिणाम मुलांच्या खेळांवर झालेला दिसुन येतो. पुर्वी मुले घरात कमी तर बाहेर खेळण्यातच मश्गुल असायची आता घरातच राहून मोबाईल पाहाण्यात दंग होतात. या मुलांना पाहुन यांचे शारीरिक नुकसान भविष्यातील दुबळी पिढी ठरणार आहे. म्हणून शासना पासून ते विविध संस्थांच्या माध्यमातून 'खेलो इंडिया' यावर भर दिला जातोय.

याचाच एक भाग म्हणून आमच्या आर.सी. पटेल एज्युकेशन संस्थेने विद्यार्थ्यासाठी, खेळाची आवड निर्माण होण्यासाठी खेळाची माहिती होण्यासाठी झाँकीतून खेळ दर्शनाचा उपक्रम राबवला. आमच्या संस्थेत दरवर्षी मम्मीजी क्रिडा महोत्सव डिंसेबर महिन्यात राबवला जातो. संस्थेतील सर्व शाखातील विदयार्थ्यांसाठी खेलकुद स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धेच्या उद्‌घाटना प्रसंगी ' झाँकी' च्या माध्यामातून विद्यार्थ्यांना विविध मुल्यांचे दर्शन घडवले जाते. या क्रिडा महोत्सवात शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक विभागातील २६ शाळांमधील १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.शालेय शिक्षण मंत्री अमरिशभाई पटेल, भुपेशभाई पटेल, नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, तपनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या प्रेरणेतून दरवर्षी भव्य स्वरूपात क्रीडा महोत्सव संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. उमेश शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येतो.

क्रीडा महोत्सवात दरवर्षी वेगवेगळ्या विषयांवर आधारित झांकीचे आयोजन होते. या महोत्सवात 'स्पोर्ट्स' या विषयावर आधारित झांकीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.प्रत्येक झांकी सादरीकरणासाठी दोन मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. विद्यार्थ्यांना बालवयातच आपल्या



आवडत्या खेळाची निवड करता यावी.निवडलेल्या खेळात सरावाने नैपुण्य प्राप्त करता येते याचा प्रत्यय क्रीडा स्पर्धांमधून येत असतो.

संस्थेने विविध खेळाचे प्रशिक्षक नेमलेले असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांना बालपणातच होतांना दिसून येतो.अनेक खेळाडू राज्य व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचा नाव लौकिक करीत आहेत. आर.सी.पटेल संस्थेतील सहभागी शाळांनी खालील खेळांची ओळख झाँकीच्या माध्यमातून करून दिली. या झाँकीच्या निमित्ताने उपस्थित हजारो विद्यार्थ्यांना विविध खेळांची आवड निर्माण होवून खेलो इंडिया चा उद्देश नक्कीच सफल होईल यात शंका नाही. कुस्ती, रोईंग , क्रिकेट, टेबलटेनिस, खो-खो, हॉकी, सायकलिंग, टेनिस, बास्केटबॉल, कबड्डी कबड्डी, हँडबॉल, फुटबॉल , वेटलिफटिंग ,योगा, बेसबॉल, बॉक्सिंग, रस्सीखेच , बॅडमिंटन, अथलेटिक्स , तलवारबाजी , जम्परोप , कराटे ,रग्बी ,बुल फायटिंग , व्हॅलीबॉल,घोडेस्वारी.





**तापीराम पावरा**
जि.प.शाळा कोडीद ता.शिरपूर जि.धुळे
९६८९३७५५६६

# आम्हा शाळेचा अभिमान !



सातपुडाच्या पर्वताच्या पायथ्याशी वसलेलं कोडीद गाव गाव तसं लहानच परंतू पंचक्रोशीतील मोठ्या गावच्या रांगेत याचाही समावेश . बहुतांश वस्ती आदिवासी समाजाची. पावरा जमातीच्या लोकांची. पूर्वी शिक्षणापासून दूर असलेल्या या जमातीला शिक्षणाला शिक्षणाचे महत्त्व पटल्याचे दिसून येते.

जि.प केंद्रशाळा कोडीद हि बोराडी बीट मधील शाळा असून शाळेचा पट २३७ आहे. उपस्थिती २२० च्या सरासरीने असते. शाळासिद्धी श्रेणीत 'अ' श्रेणी असून शाळा १००% आदीवासी आहे. शाळेत एकूण ८ शिक्षक व १ पदोन्नती मुख्याध्यापक कार्यरत आहेत. विविध उपक्रम राबवून मुलांना शाळेची गोडी लावण्यात आम्ही यशस्वी ठरलोय.

स्वच्छ सुंदर हिरवी शाळा: शाळेला रंगरंगोटी केलेली असून बोलक्या भिंती केलेल्या आहेत. शाळेत पुरेसे क्रिडा साहित्य असून फुलांची झाडे इतर वृक्षारोपण करून परिसर हिरवेगार केले आहे

डिजीटल वर्ग:शाळेच्या शिक्षक वर्गाने लोकजागृती करून लोकवर्गणी सुमारे १,५०,००० इतकी जमा केली . त्यातून डिजीटल वर्ग, माईक सिस्टीम, मुंलाना दप्तरे, बुटमोजे व स्वेटर वाटप इ. वर खर्च केलेला आहे.

क्रिडास्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा: तालुकास्तरावरील शाळा दरवर्षी तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत भाग घेतला. तसेच सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेतला जातो. प्रश्नमंजुषा स्पर्धेत शाळेने सलग सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये प्रथम क्रंमाक पटकविला आहे. शाळा व्यवस्थापन समितीने पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गावातून भव्य मिरवणूक काढली व सन्मान केला.

सहशालेय उपक्रम: शाळेत नेहमी सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते. जयंती, पुण्यतिथी निमित्ताने निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, रांगोळी, इत्यादीचे आयोजन केले जाते. तसेच परिसर भेट, क्षेत्र भेट यांचे नियोजन केले जाते तसेच आनंद मेळाव्यांचे आयोजन केले जाते.

कामसू व होतकरू स्टाफ :शाळेचे शिक्षक उच्चशिक्षित व अभ्यासू आहेत. दैनंदिन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर शै. साहित्यांचा वापर करतात. मुलांची गुणवत्ता वाढीसाठी सतत धडपड करीत असतात. मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन मोलाचे आहे. एकमेकांमध्ये सुसंवाद आहे.

पालकभेट व गृहभेट: शिक्षक प्रत्येक पालकांच्या घरी जावून त्याचे प्रबोधन करतात. मुलांचे शिक्षक, आरोग्य, उपस्थिती, स्वच्छता इ. बाबद जागृती करतात. त्यामुळे स्थलांतरीत विद्यार्थी प्रमाण कमी झाले .

शालेय व्यवस्थापन समितीचा प्रभावी वापर: शाळा व गाव एक असावा या हेतूने शाळा व्यवस्थापन समिती शाळेत कार्यरत आहे. शाळेच्या प्रगतीसाठी समिती अध्यक्ष व सदस्य संवेदनशिल आहेत. शाळेच्या कोणत्याही उपक्रमात समितीचे



योगदान १००% असते. सहकार्य असते.

सौर उर्जा व इनव्हर्टर बॅटरीचा उपयोग: शाळेला २४ तास विद्युतपुरवठा व्हावा यासाठी ग्रामपंचायतने सौर उर्जा पॅनल बसवून दिले आहे. तसेच लोकवर्गणी व शिक्षक वर्गणीतून इनव्हर्टर बॅटरी उपलब्ध करून दैंनदिन अध्यापनासाठी त्याचा वापर केला जात आहे.

शाळेला मिळालेल्या पुरस्कारांपैकी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद शाखा शिरपूर वतीने गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार., तालुककास्तरीय प्रश्नमजुषा कार्यक्रमात सलग दोनवेळा प्रथम पारितोषिक पुरस्कार. सांस्कृतिक कार्यक्रम तालुकास्तरीय प्रथम क्रमांक पुरस्कार. ४. शाळेतील दोन शिक्षकांना राज्यपुरस्कार.यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

आपल्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याकडे पालकांचा कल आहे. विशेषत: आदिवासी विभागामार्फत चालणाऱ्या आश्रमशाळामध्ये प्रवेश मिळवण्याची धडपड असते. त्याचबरोबर गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांतही याच मुलांची संख्या जास्त आहे. अशी पार्श्वभूमी असलेल्या गावातील आमची जिल्हा परिषदेशी केंद्रशाळा आहेत. आमची शाळा तशी मध्यवर्ती एकूण खोल्या...मैदान तसे लहानच आहे. शाळेची स्थापना १९५४ सालची आजपावेतो अडीच हजाराच्या पुढे विद्यार्थींचा शाळेतून गमभन शिकून गेली आहेत.

## शिक्षण वार्ता...

# पुणे जि.प.चा 'एक पुस्तक' पॅटर्न राज्यात

विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी व्हावे यासाठी पुणे जिल्हा परिषदेकडून सर्व शाळांमध्ये सर्व विषयांचे एकच पुस्तक हा पॅटर्न राबविण्यात आला. हा पॅटर्न विद्यार्थ्यांसाठी फायद्याचा असल्यामुळे आता तो राज्यातील सर्व शाळांमध्ये राबवण्यासाठी अभ्यासक्रम तयार केला जात आहे.

पुणे जिल्हा परिषदेने मात्र बालभारतीच्या पुस्तकांबरोबरच स्वतःचा सर्व विषयांचा तिमाही अभ्यासक्रम असणारे एकच पुस्तक विद्यार्थ्यांना देऊन दप्तराचा भार हलका केला होता. त्यासाठी शिक्षणाधिकारी सुनील कुऱ्हाडे यांनी विशेष प्रयत्न करून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली होती. त्याचे चांगले परिणाम विद्यार्थ्यांमध्ये दिसून आले.

पुणे जिल्हा परिषदेने राबवलेल्या पॅटर्नप्रमाणे राज्याच्या शिक्षण विभागाने आता असे धोरण आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तक ठेवण्याऐवजी सर्व विषयांचा समावेश असलेले एकच पुस्तक विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

सुरुवातीला पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी काही जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा पॅटर्न राबविण्यात येणार आहे. एकत्रित पुस्तके तयार करण्याबाबत चर्चा शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शिक्षण विभागातील अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली. त्यामध्ये विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्याबरोबच एकत्रित पुस्तके तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली. एकत्रित पुस्तकांप्रमाणेच पुस्तके द्विभाषिक करण्याचाही निर्णय घेतला आहे. भाषेव्यतिरिक्त इतर विषयांच्या पुस्तकांत संकल्पना इंग्रजीतूनही देण्यात येणार आहेत. सेमी इंग्रजी शाळांसाठी स्वतंत्र पुस्तके असावीत या मागणीला जोडून द्विभाषिक पुस्तकांची कल्पना विभागाच्या विचाराधीन होती. येत्या शैक्षणिक वर्षांत प्रायोगिक तत्त्वावर अशी पुस्तके तयार केली जाणार आहे. त्यासाठी बालभारतीच्या अधिकाऱ्यांना देखील सूचना दिल्या आहेत.



संदेश नंदकिशोर हजारे
जि.प.शाळा ता.शिरपूर जि.धुळे
९८५०९६४६०१

# मागे वळून पाहतांना

**रोहीणी अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण. :** २१ फे ब्रुवारी १९९९ या दिवशी पहिल्या पुर्णत: भारतीय बनावटीच्या ‘रोहीणी अग्निबाणाचं ’ यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले.स्पेस सायन्स ॲन्ड टेक्नॉलीजी सेंटर या संस्थेने पुर्णत: भारतात विकसित केलेल्या‘ रोहीणी-७५’ या भारतीय बनावटीचे अग्निबाणाची यशस्वी चाचणी थुंबा येथे करण्यात आली.

१९६५ मध्ये स्पेस सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी सेंटर या संस्थेची स्थापना थुंबा येथे करण्यात आल्यानंतर भारतीय बनावटीचे अग्निबाण तयार कराण्याचे प्रयत्न सुरू झाले. या अग्निबाणांच्या मालिकेर्ला रोहीणी ’नाव देण्यात आले. या मालिकेतील पहिल्या अग्निबाणाच्या व्यास ७५ मिलीमीटर असल्याने त्यांच नाव रोहीणी ७५’ असं ठेवण्यात आर्ले १०० किलो वजनाचा लोड ३२० कि.मी रोजी यशस्वी सोडण्यात भारतीय वैज्ञानिक २१ फेब्रुवारी १९६९ रोजी यशस्वी झाले होते.

**राष्ट्रीय फिल्म संग्रहालय स्थापना :** देशोदेशीच्या निवडक आणि दुर्मिळ चित्रपटांचे जतन आणि संवर्धन करणारी पुणे येथील ही प्रसिध संस्था. भारतीय चित्रपटांचे पध्दतशीर पणे संग्रह करणे आणि शास्त्रशुध्दपणे जतन करणे या प्रमुख उद्‌देशांनी केंद्र सरकाराच्या सुचना व प्रसारण मंत्रालयाच्या अधिपत्यखाली नॅशनल फिल्म आर्काइव्हज ऑफ इंडिया म्हणजेच भारतीय राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाची स्थापणा फेब्रुवारी १९६४ मध्ये करण्यात आली. चित्रपटांची केवळ निर्मिती महत्त्वाची नसून पुढील पिढ्यांसाठी हा वारसा जपणे गरजेचे आहे. या जाणीवेतुन हे संग्रहालय सुरू करण्याची कल्पना पुढे आली.

विविध भाषांतील भारतीय चित्रपटांसह जागतिक स्तरावरील उत्तमोत्त्म चित्रपट संग्रहालयांमध्ये संग्रहीत करण्यात आले आहे. आचार्य प्र.के. अत्रे निर्मित श्यामची आई हा चित्रपट सर्व भारतीय भाषांमध्ये उत्कृष्ट ठरल्याने राष्ट्रपतीचें सुवर्ण कमळ मिळवणारा पहिला चित्रपट ठरला. हे दोन्ही चित्रपट संग्रहालयात असुन चित्रपटांचे दस्तऐवजी करण करण्यासाठीची सर्व सुविधा या संस्थेमध्ये आहे. त्यात कोल्ड स्टोरेज, हॉल्टस रिळांची तपासणी यंत्रणा, डिजीटल प्रक्षेपण, डिजीटलाय झेशनची अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध आहे.

केंद्र शासनाने नॅशनल फिल्म हेरिटेज मिशन ही महत्त्कांक्षी योजना हाती घेतली असून भरीव निधी या संस्थेस दिला आहे. संस्थेचे मुख्य कार्यालय पुणे येथे असुन कोलकत्ता, बंगळुरू, तिरूअनंतपुरम येथे संस्थेची विभागीय कार्यालये आहेत.

**भारतीय क्रिकेटपटू महमंद अझरूदुदीनचा तीन शतकी विक्रम :** १ फेब्रुवारी १९८५ रोजी कानपुर येथे इंग्लंड विरूध्द तिसऱ्या कसोटी सामन्यात महंमद अझरूद्‌दीन यांने शतक झकळवल.आणि कसोटी सामन्यात तीन शतक झळकवण्याचा विक्रम त्याने नोदंवला. १९८४-८५ मध्ये मायदेशात इंग्लड विरूध्दची तीन कसोटीची मालिका आयोजित केली होती हे सामने कोलकत्ता, चैन्नई, कानपुर येथे खेळवण्यात आले. या तीनही सामन्यात अझहरने शतक झळकवली. कोलकत्ता येथे ईडन गार्डन्सवर त्याने कसोटी पर्दापण केले. पदार्पणाताच कामगिरी करणारा अझर एकमेव ठरला असुन मनगटी शैलीने अचूक टायमिंगसह त्याचे फटके आजही लक्षात आहेत.

**अरूणाचल प्रदेशास घटकराज्याचा दर्जा :** अरूणाचल प्रदेशाचा अर्थ उगवत्या सुर्याचा प्रदेश असा होतो. हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखंरापासुन ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यापर्यंत डोंगराळ बनानी व्यापलेला हा केंद्रशासित प्रदेशास २० फेब्रुवारी १९८७ रोजी घटकराज्याचा दर्जा प्राप्त होऊ २८ वे घटकराज्य घोषित झाले.

पुर्वेकडे म्यानमार, पश्चिमेकडे भूतान, उत्तरेकडे चीन अशा तीन बाजुंनी वेढल्याया या प्रदेशात भिन्न जमातीनी व्यापलेला आहे. तीन बाजुंनी वेढलेल्या या प्रदेशाात भिन्न जमातीनी व्यापलेला आहे. १९५४. मध्ये ‘ नेफा ’ भागाला विकासासाठी दर्जा दिला गेला तर १९७२ मध्ये केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देऊन ‘ अरूणाचल प्रदेश ’ हे नाव ठेवण्यास आले. त्यानंतर १९८६ मध्ये तवांग , कामेंगख पुर्व सिअँग, लोअर दिबांगख पॉम्पेअर आदी १६ जिल्हयांच्या समावेश असलेल्या अरूणाचल प्रदेशास घटकराज्यांचा दर्जा मिळाला. व इटानगर ही राजधानी म्हणून घोषीत करण्यात आले. १४ व्या शतकातील इटाफोर्ट किल्लावरून इटानगर हे नाव पडले आहे.

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा १००० ते २००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.


६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.


७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.


८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 | शिक्षण यात्री | Postal Registration No.DHL/557/2018-20




# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ३५० रूपये    द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये    त्रैवार्षिक वर्गणी-. १००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--512700301000129 Ifsc-VIJB0005127

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..........................................................
..........................................................

Pragati Arts Shirpur 8421356261